# संपादकीय

**बालसाहित्यक्षेत्रातील महिला साहित्यकारांचे योगदान**

केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस ही जगातील आद्य प्रकाशन संस्थांपैकी एक. ब्लूम्सबरी पब्लिशिंग प्लेसच्या सहकार्याने या संस्थेने नुकतेच एक बालसाहित्याचे प्रदर्शन केंब्रिज युनिव्हर्सिटीच्या ग्रंथालयात भरवलेले होते. 'दि जर्नी टू हॉगवॉर्टस् २५० वर्षांची बालसाहित्यकार ब्रिटिश लेखिकांची परंपरा इ.स. १७५०-२०००.' असे या प्रदर्शनाचे मुख्य सूत्र होते. गेल्या अडीचशे वर्षात बालसाहित्यक्षेत्रातील स्त्रियांच्या योगदानाचे बृहत् दर्शन घडविण्यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला होता; त्या मागचे तात्कालिक कारण म्हणजे हॅरी पॉटर या किशोर नायकावर आधारित कादंबऱ्यांचे अपूर्व यश! या कादंबऱ्यांच्या विक्रीने चार कोटी प्रतींची मर्यादा अगदी अल्पकाळात पार केली आणि एक इतिहास निर्माण केला. हॅरी पॉटर मालिकेची लेखिका जोना कॅथलिन रौलिंग ही त्यामुळे इंग्लंडमधील सर्वात श्रीमंत लेखिका ठरली आहे. आपल्या पहिल्या पुस्तकाचे हस्तलिखित घेऊन ती प्रकाशकांचा शोध घेत राहिली तेव्हा तिलाही आरंभी नकारघंटा ऐकत राहावी लागली. ब्लूम्सबरीने शेवटी ते प्रकाशनासाठी स्वीकारले; आणि जादू शिकवणाऱ्या हॉगवार्टर्स विद्यालयात हॅरी पॉटर या कुमार नायकाला जी काही धमाल बघायला मिळते तिच्या गमतीजमतींनी इंग्लंड-अमेरिकेतल्या मुलांना तर भुरळ घातलीच, प्रौढ वाचकांचेही बालपण अभिमंत्रित केले. हॅरी पॉटरने इंग्लंड-अमेरिकेतल्या मुला-मुलींना ग्रंथ वाचनाकडे पुनश्च वळवले; दूरचित्रवाणीपासून त्यांना दूर नेण्याची जादू करून दाखवली, असे म्हटले जाते. या लेखिकेच्या या असामान्य यशाच्या निमित्ताने केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस आणि ब्लूम्सबरी पब्लिशिंग प्लेस या दोघांनी एकत्र येऊन ब्रिटिश बालसाहित्यकार महिलांचे गेल्या अडीचशे वर्षातले वाङ्मयीन कर्तृत्व प्रदर्शनरूपाने नागरिकांसमोर आणण्यासाठी भव्य प्रदर्शनाचे आयोजन केले. केंब्रिज युनिव्हर्सिटीच्या ग्रंथालयात ग्रेट ब्रिटनमध्ये प्रकाशित होणाऱ्या प्रत्येक पुस्तकाची प्रत येतच असते. त्यामुळे हे प्रदर्शन भरविण्यासाठी बाहेर कोठून पुस्तकांची जमवाजमव करण्याची गरज पडली नाही. लायब्ररीच्या दुर्मिळ ग्रंथ विभागातून सर्व पुस्तके सहजपणे उपलब्ध झाली.

या प्रदर्शनातील पुस्तकांची कालानुक्रमे मांडणी करण्यात आली होती आणि महत्त्वपूर्ण पुस्तकांच्या लेखिकांची छायाचित्रे, चरित्रपर माहिती खास तक्त्यांद्वारे समाविष्ट केली होती. पुस्तकाच्या प्रकाशनाचे वर्ष, त्या पुस्तकातील चित्रे काढणाऱ्या कलावंताचे नाव, पुस्तकाचे त्या त्या वेळी झालेले स्वागत (परीक्षणे, बातम्या, मुलाखती) यांचीही नोंद करण्यात आली होती. त्यामुळे बालसाहित्याच्या अभ्यासकांना हे प्रदर्शन म्हणजे एक मोठीच पर्वणी वाटणे स्वाभाविक होते. या प्रदर्शनाची अनेक नामवंत समीक्षकांनी दखल घेतली; आणि त्यातून बालसाहित्याकडे पाहण्याचा पालकांचा, समाजाचा, शिक्षणसंस्थांचा, धर्मसंस्थांचा आणि शासनाचा दृष्टिकोन कसा बदलत गेला याचाही मागोवा घेण्याचा प्रयत्न केला.



मराठी प्रमुख बालसाहित्यकारांची नावे सांगायची झाली तर ज्यांची शंभराच्या आसपास पुस्तकसंख्या आहे अशी नावे कमी सापडतील. विनायक कोंडदेव ओक, बाळशास्त्री जांभेकर, वा. गो. आपटे, सानेगुरुजी, ना. धों. ताम्हनकर, भा. रा. भागवत, के. नारखेडे, पा. ना. मिसाळ, रेव्ह. टिळक, बालकवी, राजा मंगळवेढेकर, शं. रा. देवळे, सुधाकर प्रभू वगैरे नावे समोर येतात. पिरोज आनंदकर, लीलावती भागवत, मालती दांडेकर, सुमती पायगावकर यांच्या पुस्तकांची संख्याही पन्नाशीच्या पुढे असेल; परंतु फक्त बालसाहित्यच प्रामुख्याने लिहिणाऱ्या महिलांची संख्या कमीच दिसते. एनिड ब्लायटनसारखी सातशेवर पुस्तके लिहिणारी लेखिका मराठीत वा भारतीय भाषांत कोणी नाही.

केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेसच्या या प्रदर्शनातून समोर आलेल्या काही बाबींकडे लक्ष वेधावेसे वाटते.

हॅरी पॉटरच्या लेखिकेला, जोना कॅथलित रौलिंगलाही आपले नाव लेखिका म्हणून छापावे की नाही असा प्रश्न पडला होता. म्हमून हस्तलिखितावर जे.के. रौलिंग असे मोघम नावच तिने दिले होते. एका लेखिकेने लिहिलेली कादंबरी म्हणून बालवाचक तिचा स्वीकार करतीलच अशी तिला खात्री वाटत नव्हती. परंतु केवळ तिलाच ही खात्री नव्हती अशातला प्रकार नाही. अडीचशे वर्षांपूर्वीही हीच स्थिती होती. अनेक लेखिका टोपण नावाने लिहीत; पुरुषाच्या नावाने पुस्तके छापत.

१७४० च्या सुमाराला जी बालकथांची पुस्तके बाजारात आली त्यांच्या लेखिकांनी आपली खरी नावे लपवलेली होती; आणि पुरुषाच्या नावाने ती छापलेली होती. १७९० नंतर मात्र स्त्रियांची नावे पुस्तकांवर दिसू लागली. प्रौढ कादंबऱ्याही स्त्रियांच्या नावावर येऊ लागल्या. बालवाङ्मयाबाबतही स्त्रियांचा लेखिका म्हणून अधिकार थोडाफार समाजसंमत होऊ लागला. शिक्षिका, माता, पालक म्हणून मुलामुलींवर संस्कार करण्याची जबाबदारी महिलांवरच असे; तेव्हा संस्कारक्षम कथाकादंबऱ्यांचे लेखन करण्याचा त्यांचा अधिकारही मानणे समाजाला इष्ट वाटले. तरीही पुरुषी अहंकार पूर्णपणे लोप पावला असे नाही. मुलांना शिस्त लावण्यासाठी कठोर शिक्षा हाच एकमेव मार्ग असे मानणाऱ्या कुटुंबप्रमुखाची अरेरावी चालेच; बायकांचे नाजूक हळुवार शिकवणे आणि लाडप्यार करणे म्हणजे मुले नक्की बिघडणार असे त्या वेळीही मानले जाई. तरीही स्त्रिया मुलांकरिता हळुवार बोधपर गोष्टी लिहू लागल्या, त्यांच्यावर संस्कार करू लागल्या. रोज रात्री झोपण्यापूर्वी मुलांना गोष्टी सांगत राहिल्या. ग्रिम बंधू किंवा हॅन्स अंडरसनच्या परीकथांची लोकप्रियता वाढू लागली. त्यांची भाषांतरे होत राहिली.

या प्रदर्शनात सारा ट्रिनर (१७४१-१८१०) हिचे 'दि स्टोरी ऑफ दि रॉबिन्स', हे पुस्तक ठेवण्यात आले होते. त्यात प्राण्यांशी कसे वागावे याबद्दल उपदेश आहे. त्या पुस्तकात चित्रेही आहेत. चित्रांचा वापर करणाऱ्या आरंभीच्या पुस्तकांपैकी हे एक गणले जाते. 'सारा फिल्डिंग' (१७१०-१७६८) ही कादंबरीकार हेन्री फिल्डिग याची बहीण. पहिली बालकादंबरी लिहिण्याचे श्रेय तिला दिले जाते. 'दि गव्हर्नेस' ही तिची कादंबरिका मुले आणि त्यांची आया यांच्यातील भावबंध चित्रित करते.

उंदीर हा नायक धरून लिहिलेली पहिली कथा डोरोथी किलमेर हिने लिहिली. सुसाना मूडी या लेखिकेनेही 'पीटर रॅबिट' मध्ये सशाला हीरो बनवले. ॲना सेवेल हिने 'ब्लॅक ब्युटी'मध्ये

एका देखण्या घोडीची कथा सांगितली. कवी पर्सी बेसी शेली याची सासू मेरी वोलस्टोनक्राफ्ट हिने स्त्रीवादी भूमिका मांडली; त्याचबरोबर ओरिजिनल स्टोरीज फ्रॉम रियल लाइफ हे गोष्टींचे पुस्तकही मुलांसाठी लिहिले. त्या पुस्तकात वुंइल्यम ब्लेक या कवीने काढलेल्या चित्रांचा समावेश केला गेला होता.

मुलांवर नीतिमूल्यांचे संस्कार करण्यासाठी गोष्टींचे लेखन हा उद्देश आरंभापासून लेखक लेखिकांनी समोर ठेवलेला आहेच. मेरी मार्था शेरवुड (१७७५-१८५१) हिच्या 'दि हिस्टरी ऑफ दि फेअर चाइल्ड फॅमिली' मध्ये अशा संस्कारक्षम कथांचीच एक मालिका पेश करण्यात आली आहे. शालॉटी मेरी मंग हिने १६० पुस्तके लिहून आदर्श मुलामुलींच्या वर्तनाचा वस्तुपाठच वाचकांसमोर ठेवला. एडिथ नेसबिट या लेखिकेने 'रेल्वे चिल्ड्रेन' मध्ये आगगाडीच्या स्थानकाशी निगडित मुलांचे जीवनदर्शन चितारले. कामगारांच्या मुलांचे जीवन ईर्ह गार्नेट (१९००-१९९१) हिने कादंबऱ्यांमधून प्रकट केले. तर --- हुशार मुलींच्या कथा एलिझाबेथ थॉमासिना मीड हिने लिहिल्या. साहसकथांना १९ व्या शतकाच्या शेवटी मोठी मागणी येऊ लागली. दि डेमन हेडमास्तर या गिलियन क्रॉसच्या कादंबरीनेही लोकप्रियता मिळवली. शाळेच्या पार्श्वभूमीवरच्या कथाकादंबऱ्याही अनेक लेखिकांनी लिहिल्या. एनिड ब्लायटनने ७०० वर पुस्तके लिहून लोकप्रियतेचा व खपाचा उच्चांक गाठला. तिच्या मृत्यूला दोन दशके झाली; पण आजही ती आघाडीवर आहे. एकूणच इंग्लंड अमेरिकेत बालसाहित्य क्षेत्रात स्त्रियांचे योगदान नजरेत भरावे असे आहे. मराठीत ते तसे नसावे. तरीही मराठीतील एकूणच बालसाहित्याच्या संदर्भात असे एखादे प्रदर्शन भरवले गेले तर त्यावरूनही आपल्या समाजजीवनातील अभिरुचीच्या जडणघडणीचे व मुलांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनातील बदलाचे अनेक टप्पे ध्यानात येऊ शकतील. मराठी प्रकाशक संघटना शतकाची शिदोरी हा प्रकल्प हाती घेत आहे. त्या निमित्ताने प्रौढ साहित्याचे एक शतकव्यापी सिंहावलोकन करण्याची संधी लाभली आहे. बालवाङ्मयाबाबतही अशी एखादी योजना आखता येऊ शकेल. नव्या सहस्त्रकात बालसाहित्याचे महत्त्व वाढणार आहे; बालसाहित्याचा खपही वाढणार आहे. सकस, संस्कारक्षम, रंजक, माहितीपर असे बालसाहित्य भावी पिढ्या घडवत असते. त्यासाठी त्याची पालक-शिक्षक-लेखक या सर्वांनीच गंभीरपणे दखल घेण्याची गरज आहे.

संपादक

**जन्माआधीच्या काळापासून ते शाळेत जाईपर्यंत मुलांच्या संदर्भात पालकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते, त्यांवर चिकाटीने मात करण्यासाठी शास्त्रशुद्ध मार्गदर्शन.**

**मुलांच्या समृद्ध जीवनासाठी**

**डॉ. सुचित तांबोळी**

**पृष्ठे :१८४ / किंमत : १००रु. / सवलतीत : ८५रु. / सभासदांना : ७५रु. / पोस्टेज : १५रु.**



साहित्यवार्ता

## बारामतीनगरीत मोरोपंत आजही उपेक्षित

ज्ञानेश्वरांची ओवी व तुकाराम महाराजांचा अभंग यासोबत ज्यांच्या आर्यांची आठवण केली जाते ते कविश्रेष्ठ मोरोपंत त्यांच्याच बारामती नगरात आजही उपेक्षितच आहेत.

दरवर्षी हनुमान जयंतीस कविवर्य मोरोपंतांची पुण्यतिथी बारामतीत साजरी केली जाते. मात्र या कविवर्यांचे एखादे उचित स्मारक व्हावे ही बारामतीकरांची इच्छा मात्र आजही अपूर्णच आहे. प्रखर राजकीय इच्छाशक्तीअभावी शासनाचे दुर्लक्ष झाल्याने त्यांचे स्मारक व्हावे ही कल्पना मूर्त स्वरूप धारण करू शकलेली नाही. कविवर्य मोरोपंत यांच्या नावाने वाचनालय, एक शाळा, एक वाद वक्तृत्वस्पर्धा असा अपवाद वगळला तर मोरोपंतांच्या स्मृती कायम राहतील, अशी कोणतीही वास्तू नाही. ज्या ठिकाणी मोरोपंत लेखन करीत ती खोली ना. गो. प्रभुणे यांनी जतन करून ठेवलेली आहे.

मोरोपंत हे अचाट बुद्धिमत्तेचे होते. त्यांच्या आर्यातून व काव्यरचनेतून त्यांची बुद्धिमत्ता दिसून येते. त्यांनी रचलेले 'निरोष्ठ रामायण' हे जगातील अद्भुत काव्यरचनांपैकी एक समजले जाते. मोरोपंतांनी त्यांच्या जीवनात पाऊण लाख आर्यांची रचना केली. आजमितीस त्यांच्या सर्वच आर्या उपलब्ध नसल्या, तरी अनेक महत्त्वाच्या आर्या एवढेच नव्हे तर मोरोपंतांचे हस्ताक्षरही आज पाहावयास मिळते. त्यांचे एखादे स्मारक होत नाही, याची खंत मोरोपंत स्मारक समितीला तशीच रसिक बारामतीकरांनाही आहे.

कविवर्य मोरोपंत यांच्या २०७ व्या पुण्यतिथीनिमित्त (ता. ८ एप्रिल) बारामतीत विविध कार्यक्रम झाले. डॉ. न. म. जोशी यांचे महाकवी, गदिमा आणि महाकवी मोरोपंत' या विषयावर व्याख्यान झाले.

अध्यक्षस्थानी बारामतीचे जिल्हा सत्र न्यायाधीश बी.टी. नरवाडे पाटील होते.

## वेद लवकरच जगभर उपलब्ध

सर्व वेद कॉम्पॅक्ट डिस्कवर घेण्याचा प्रकल्प वेदशास्त्रोत्तेजक सभेने हाती घेतला असल्याने आता वेद देशाबाहेरील अभ्यासकांनाही सहजगत्या उपलब्ध होऊ शकतील, अशी माहिती वेदशास्त्रोत्तेजक सभेचे अध्यक्ष डॉ. पु. स. पाळंदे यांनी पुणे येथे दिली.

वेदशास्त्रोत्तेजक सभेच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी सांगता समारंभात ते बोलत होते. विधान परिषदेचे माजी सभापती जयंतराव टिळक या वेळी उपस्थित होते. सभेने प्रकाशित केलेल्या 'तैत्तिरीय ब्राह्मणम्' या ग्रंथाची माहिती उपाध्यक्ष वि. आ. धर्माधिकारी यांनी दिली. धर्माचा पारंपरिक पद्धतीने अभ्यास करणाऱ्यांना या ग्रंथाचा उपयोग होईल, असे त्यांनी सांगितले. ग्रंथाच्या प्रकाशनासाठी शंकर यादव-पोंक्षे ट्रस्टने आर्थिक मदत केली आहे.

## दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेस दर वर्षी लाखाचे अनुदान मंजूर

कोल्हापूर येथील दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेचे गेल्या वीस वर्षे चाललेले कार्य पाहून

शासनाने सभेस प्रतिवर्षी एक लाख रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे.

या सभेची स्थापना यशवंतराव चव्हाण यांच्या प्रेरणेने झाली. सभेतर्फे पहिले दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलन १९८२ मध्ये प्रसिद्ध साहित्यिक ग. ल. ठोकळ यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. तेव्हापासून हे संमेलन सातत्याने होत आहे. सभेचे मुखपत्र असलेले दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका हे द्वैमासिक अखंडपणे चालू आहे. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीच्या विकासासाठी सभेने केलेल्या प्रयत्नांची दखल घेऊन शासनाने अनुदान मंजूर केले आहे.

### जळगावला साने गुरुजी पुण्यतिथीनिमित्त स्नेहमेळावा

जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ संचलित पूज्य साने गुरुजी संस्कार केंद्राच्या वतीने ११ जून, २००१ रोजी साने गुरुजींचा सहवास लाभलेल्या व्यक्तींचे स्नेहमीलन संमेलन आयोजित करण्यात आले आहे.

हे संमेलन विद्यापीठाच्या परिसरातच घेण्यात येणार आहे. साने गुरुजींचा सहवास लाभलेल्या व्यक्ती ७० ते ७५ च्या घरात आहेत. अशा व्यक्तींना एकत्र आणून गुरुजींच्या स्मृतींना उजळा देण्याचे कार्य या संस्कार केंद्रातर्फे हाती घेण्यात आले आहे.

संस्कार केंद्राचा पत्ता : डॉ. के. बी. पाटील, कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ (साने गुरुजी संस्कार केंद्र), उमविनगर, पो. बॉ. क्रमांक ८०, जळगाव.

### अशी भरधाव स्कूटर घेते, जशी झाशीची राणी शोभते

*'आमची आई स्कूटर चालविते,*
*चालविते, पाठिमागे मला बसविते,*
*अशी भरधाव स्कूटर घेते,*
*जशी झाशीची राणीच शोभते...'*

सध्या झपाट्याने होत असलेल्या नागरीकरणाचा आपल्या चिमुकल्या विश्वातून धीटपणे वेध घेणाऱ्या ऋतुराज गोवईकरचे काव्यवाचन पूर्ण होताच सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला.

लक्षपूर्वक वाचा...
यामुळे आपण पुढील नवीन स्पर्धा जिंकू शकाल...

**''कसं मारणार? त्यांच्या हातात लोखंडी गज होते. शिवाय काही झालं, तरी मुसलमानांना हात देखील लावण्याचा हिंदूंना अधिकार नाही. हो ना ? भारतात अल्पसंख्यांक मुसलमानांना प्रतिकार करण्याचा अधिकार आहे. आपल्या देशात जे घडतंय, ते जातीय दहशतवादीशिवाय दुसरं काही नाही. मग त्याला तुम्ही छळ, दडपशाही, पिळवणूक काहीही म्हणा.''** **लज्जा**

**लेखिका : तसलिमा नासरिन** **अनु.: लीना सोहोनी**

**किंमत : १२५ रु.**



निमित्त होते 'अनन्वय' या संस्थेच्या तपपूर्ती महोत्सव सोहळ्यात काव्यवाचन स्पर्धेतील पारितोषिक वितरणाच्या कार्यक्रमाचे. ज्येष्ठ साहित्यिक राम शेवाळकर, कवी व गीतकार गंगाधर महांबरे मुलांचे कौतुक करण्यासाठी आवर्जून उपस्थित होते. तपपूर्ती महोत्सवाचा एक भाग म्हणून संस्थेतर्फे काव्यवाचन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यातील यशस्वी मुलांना पारितोषिके देण्यात आली. अभिराम जोशी या मुलाने

*'संध्याकाळी मुले सगळी*
*पटंगणावर धावत आली,*
*गट करून इथे तिथे,*
*खेळामध्ये रंगून गेली...'*

ही कविता ऐकवून सुटीचे वातावरणच उभे केले.

या मुलांचे कौतुक करीत प्रा. शेवाळकर म्हणाले, ''अनन्वय'च्या या उपक्रमामधून कलेचे आरोग्य निकोप राखण्याचे मोठे सांस्कृतिक कार्य होत आहे. काही गाणी, कविता कंठातून बाहेर पडतात तेव्हा ती आभूषणे होतात, त्यांना चाल देऊन सजविण्याचे कार्य राहुल घोरपडे यांच्यासारखे हुशार संगीत दिग्दर्शक करतात, ही अभिमानाची गोष्ट आहे.''

''मुलांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाला पोषक स्पर्धांमधून कलेचा वारसा मुलांमध्ये जोपासला जातोय, ही आनंदाची गोष्ट आहे. काव्य, आणि कलेच्या प्रसारासाठी होणारे 'अनन्वय'चे कार्य कौतुकास्पद आहे,'' असे महांबरे यांनी सांगितले.

'अनन्वय'तर्फे बालवाचनालयांची साखळी उभारली जात आहे. संस्थेच्या विश्वस्त डॉ. माधवी वैद्य यांनी, काव्यवाचन स्पर्धेत मोठ्या गटात अनुक्रमे हर्षवर्धन जतकर, परिमल केळकर, सिद्धार्थ बिनिवाले; छोट्या गटात अभिराम जोशी, सक्षम कुलकर्णी, ऋतुराज गोवईकर, ऋतुप्रिता पेटकर, केतकी करंदीकर, आभा वैशंपायन आदी यशस्वी झाल्याचे सांगितले.

### राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ

राजर्षी शाहू छत्रपती महाराज यांच्या राज्यारोहण स्मृतीनिमित्त कोल्हापूरमधील 'महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी' संस्थेमार्फत 'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ' डॉ. जयसिंगराव पवार यांच्या सात वर्षांच्या परिश्रमांतून तीन खंडांत सिद्ध झाला आहे. पहिल्या खंडात राजर्षींच्या बहुआयामी कार्यकर्तृत्वाचा विविध अंगांनी वेध घेतला आहे. दुसऱ्या खंडात महाराष्ट्रातील शाहूकालीन व उत्तरकालीन ६४ अभ्यासकांचे व विचारवंतांचे लेख आहेत. तिसऱ्या खंडात राजर्षींची भाषणे, दुर्मिळ कागदपत्रे, हुकूमनामे, जाहीरनामे, दुर्मिळ छायाचित्रे आदींचा समावेश आहे.

संपर्क : रिया बुक सर्व्हिस, टाकाळा, राजारामपुरी, कोल्हापूर, ✆ : ०२३१-५२४६०१.

### संतविचार नव्या पिढीपुढे मांडल्यास नवसमाजाची निर्मिती

''संतांचे सखोल, चिंतनशील विचार नव्या पिढीसमोर समग्र स्वरूपात मांडल्यास जातीपातींच्या भिंती गळून पडून नवसमाजाची निर्मिती होईल,'' असे मत संत साहित्याच्या अभ्यासिका डॉ. उषा देशमुख यांनी पुणे येथे व्यक्त केले.

पुणे विद्यापीठाच्या संत नामदेव अध्यासनातर्फे परमहंस स्वामी स्वरूपानंद पुरस्कार 'ज्ञानेश्वरी चिंतन' या पुस्तकासाठी डॉ. देशमुख यांना कुलगुरू डॉ. अरुण कोळस्कर यांच्या हस्ते प्रदान

करण्यात आला. दै. 'सकाळ'चे संपादक अनंत दीक्षित प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

संतांच्या बहुआयामी, बहुविध व्यामिश्र व्यक्तिमत्त्वाचा नव्या परिक्षेपातून, विविध पातळ्यांतून अभ्यास करण्याची गरज आहे, असे सांगून डॉ. देशमुख म्हणाल्या, ''महाराष्ट्रात निर्णायकी काळात संतांनी समाजाचे प्रबोधन केले. त्यांची जीवननिष्ठा, श्रद्धा, विवेक, कर्तृत्व आदी मूल्ये पुढे न्यायला हवीत. पाश्चात्त्य संस्कृतीमागे धावण्यापेक्षा आपल्या शक्तिस्थानांचा विचार पुढे नेला तरच नव्या समाजाची निर्मिती होऊ शकेल. संतांचे हे विचार समाज एकसंध करण्यास बहुमोल ठरतील.''

समाजातील चांगल्या वाईट मूल्यांच्या संघर्षाचा परामर्श श्री. दीक्षित यांनी घेतला.

डॉ. कोळस्कर म्हणाले, ''संतांच्या थोर परंपरेमुळे महाराष्ट्राच्या संस्कृतीला आगळे महत्त्व आहे या काळात खऱ्या अर्थाने माणूस घडवायचा असेल तर संतांचे विचार महत्त्वाचे आहेत.''

समारंभाचे प्रास्ताविक संत नामदेव अध्यासनाचे प्रमुख डॉ. अशोक कामत यांनी केले. स्वामी स्वरूपानंद सेवा मंडळाचे माधवराव पटवर्धन, परीक्षक डॉ. वि. मा. बाचल यांचीही भाषण झाले.

'दाक्षिणात्य साहित्य संस्कृतीचा मराठीशी अनुबंध' या पुस्तकासाठी डॉ. माणिक धनपरवाल व त्या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी राज्य मराठी विकास संस्थेलाही हा पुरस्कार जाहीर करण्यात आला.

### शोधबंदचे प्रकाशन

'महानुभाव साहित्याचे संशोधन अजूनही अपूर्णावस्थेत आहे, असंशोधित साहित्य खूप आहे. महाराष्ट्राच्या संस्कृतीचा नव्याने इतिहास मांडायचा असेल, तर या साहित्याचा विविध अंगांनी अभ्यास व्हावा,' असे मत डॉ. रमेश आवलगावकर यांनी व्यक्त केले.

डॉ. अण्णासाहेब लिखित 'शोध बंद' या मीरा प्रकाशनच्या पुस्तकाने साहित्याचा विविध दृष्टिकोनांतून अभ्यास कसा करावा याचा वस्तुपाठ घालून दिला आहे, असेही ते म्हणाले.

महानुभाव पंथाच्या यशापयशाची मीमांसा करताना ते म्हणाले की, धर्मप्रसाराच्या दृष्टीने महानुभाव वारकऱ्यांच्या तुलनेने कुठेही मागे राहिलेले नाहीत. 'शोधबंद' चे प्रकाशन डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते झाले. ते म्हणाले की गद्य ही भाषेची प्रकृती आहे. ती समजून घेतल्याशिवाय


**लक्षपूर्वक वाचा...**

**यामुळे आपण पुढील नवीन स्पर्धा जिंकू शकाल...**

**आपल्याच गुळगुळीत टकलावरून हात फिरवत तो हात डोळे-नाकावरून गालावरून, हनुवटीपाशी घेत म्हणतात, दाढी करताना कुठपर्यंत करायची तेच कळत नाही' स्वतःच्या वैगुण्यावरही विनोद करण्याची भूमिका असल्यानंच त्यांनी केलेली रंगमंचावरची चेष्टा जिव्हारी लागत नाही- गुदगुल्या करते---**

**लाइफस्टाईल**

**लेखक : सुधीर गाडगीळ** **किंमत : १२० रु.**




पद्य समजत नाही. ज्ञानेश्वरी समजून घ्यायची असेल तर लीळाचरित्राचा अभ्यास व्हायलाच हवा.

महानुभावांच्या तत्त्वज्ञानाची बांधणी अगदी तर्कशुद्ध आहे, असे तर्कशुद्ध तत्त्वज्ञान मराठीतून देणारा महानुभाव हा पहिला पंथ आहे.

ज्येष्ठ पत्रकार अनंतराव पाटील यांनी प्रास्ताविक केले. मीरा प्रकाशनचे प्रकाश भोईटे यांनी आभार मानले.

### अशीही एक भ्रमणगाथा, ८१ वर्षांच्या तरुणाची

पर्वतीवर अनेक जण जातात, सिंहगडावरही जातात. नित्यनेमाने गेली अनेक वर्षे पर्वतीवर जात राहून वयाच्या ८१ व्या वर्षीही उत्साहाने सिंहगड चढणारे भटकाका यांचे गाथा पदभ्रमणाची हे पुस्तक ८ एप्रिलला प्रसिद्ध झाले. 'सतत चालणाऱ्याचे भाग्यही चालत राहते', या वचनाची अनुभूती रामचंद्र दिवाकर भट यांनी घेतली आहे. अनेक वेळा गिर्यारोहण मोहिमेअंतर्गत पदभ्रमण केले आहे.

गेल्या २० वर्षात त्यांनी चार हजारांहून अधिक तास पदभ्रमण करून दहा हजाराहून अधिक किलोमीटर्स अंतर चालून पूर्ण केले आहे. सहस्रचंद्र दर्शनानंतरही भटकाका दर महिन्यात तीनदा सिंहगडला उत्साहाने जातच आहेत. या काळात त्यांनी अनेक ठिकाणी प्रवास केला व नवनवे प्रदेश पाहिले. त्यातूनच फिरण्याची आवड जोपासली गेली. मे १९७९ मध्ये निवृत्त झाल्यावर मग काश्मीर सहल व तेथून अमरनाथची खडतर यात्रा पूर्ण केली.

### भेदातीत समीक्षा हे प्राचीन वाङ्मयीन संस्कृतीचे प्रमुख वैशिष्ट्य

सर्व जातीधर्मपंथवर्णांना वाङ्मयाचा प्रांत खुला असणे, विशिष्ट भाषेचे बंधन नसणे, कोणताही विषय वर्ज्य न मानणे आणि कोणत्याही पूर्वग्रहापासून अलिप्त अशी समीक्षा ही प्राचीन भारतीय वाङ्मयीन संस्कृतीची प्रमुख वैशिष्ट्ये होती, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. वा. के. लेले यांनी पुणे येथे केले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेत ज्ञानकोशकार डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्या स्मृतिदिनी ते बोलत होते.

आपल्या भाषणात डॉ. लेले यांनी ख्रिस्तपूर्व ६०० ते इसवी सन १००० अशा सुमारे १६०० वर्षांच्या कालखंडातील प्राचीन वाङ्मयाचा आढावा घेतला. भामह, राजशेखर, दण्डी, जगन्नाथ, वामन, मम्मट, रुद्रट, क्षेमेंद्र, धनंजय आदी प्राचीन शास्त्रकारांची वचने स्पष्ट करून प्राचीन भारतीय वाङ्मयीन संस्कृतीची वैशिष्ट्ये विशद केली.

### महत्त्वाकांक्षी संस्कृत कोश प्रकल्पाची दुर्दशा

हा संस्कृत कोश पुरा होईल, तेव्हा ते जगातले एक अद्वितीय काम ठरेल. या संस्कृत कोशाचे पाच खंड आजवर प्रकाशित झाले आहेत. त्याची पाने आहेत तीन हजार. सहाव्या खंडाचा पहिला भागही पुरा झाला आहे. एवढे काम झाल्यावरही अजून पहिले म्हणजे 'अ' हे अक्षर चालले आहे. यावरून या कामाच्या व्याप्तीची कल्पना येईल. पण पुण्यातल्या ऐतिहासिक डेक्कन कॉलेजात चाललेल्या या प्रकल्पाची केंद्र आणि राज्य सरकारच्या दुर्लक्षामुळे दुर्दशा झाली आहे.

गेली सहा वर्षे म्हणजे १९९५ पासून या कोशाला प्रमुख संपादक तसेच सहायक प्रमुख संपादकच नाही. त्यामुळे, पाच तज्ज्ञांची समन्वय समिती नेमून काम चालले होते. पण ही व्यवस्था उच्च आणि तंत्र शिक्षण संचालकांनी मोडीत काढली असून डेक्कन कॉलेजातील भाषाशास्त्र विभाग प्रमुखांकडे कोशाची जबाबदारी सोपविली आहे. ३१ ऑगस्ट, २००० रोजी डेक्कन कॉलेजचे संचालक निवृत्त झाल्यावर सहसंचालकांकडे काम न सोपविता सरकारने उच्च शिक्षण संचालकांकडे संस्थेचा अतिरिक्त अधिभार सोपवला. 'राष्ट्रीय संस्कृत संस्थान' या दिल्लीतल्या संस्थेकडून या प्रकल्पासाठी अनुदान मिळते. पण त्याचा फायदा घेऊन दिल्लीतली मंडळी अनेकदा हा प्रकल्प दिल्लीला नेण्याची किंवा प्रकल्प देशभरात वाटून देण्याची टूम काढतात. डेक्कन कॉलेजातला सावळा गोंधळ लवकर संपला नाही तर एक दिवस हा प्रकल्प पुण्यातून हलल्याशिवाय राहणार नाही. काही काळापूर्वी कोशाची छपाई चालणाऱ्या भांडारकर प्राच्यविद्या संस्थेने आपला जुळणी आणि छपाई विभाग बंद केला. त्यामुळे तीन वर्षे छपाईचे काम अडकून पडले आहे. खरेतर आता सारे काम संगणकावर आणि छपाईही खिळेजुळणी न करता आधुनिक रीतीने करणे आवश्यक आहे. हे लक्षात घेऊन संरक्षणमंत्री जसवंतसिंग नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष असताना त्यांनी पुण्यात असणाऱ्या नॅशनल इन्फर्मॅटिक्स सेंटरला (एनआयसी) लक्ष घालण्यास सांगितले. त्यांनी उत्तम सॉफ्टवेअर तर बनविलेच, पण तरुण संस्कृत अभ्यासकांना प्रशिक्षणही दिले. संगणक पुरविण्याची तयारी दाखविली. संगणकीकरणाचे काम मार्गी लागावे, यासाठी डेक्कन कॉलेज, एनआयसी आणि मनुष्यबळ विकास खाते यांच्यात एक करारही होणार होता. पण आता गटतटांच्या राजकारणात प्रकल्प पुढे नेण्याचे काम राहून जाते आहे.

(सारंग दर्शने, महाराष्ट्र टाइम्स)

**तुकोबाराय साहित्य परिषद**

मराठा सेवा संघाच्या अंतर्गत असलेल्या 'जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषदे'च्या वतीने जालना येथे एक दिवसाचा साहित्य मेळावा घेण्यात आला. या परिषदेचे राज्य समन्वयक प्रा.


**लक्षपूर्वक वाचा...**

**यामुळे आपण पुढील नवीन स्पर्धा जिंकू शकाल...**

**मित्रहो, मी राजीनामा देऊन बाहेर पडलो असे विधान करण्याचा ढोंगीपणा न करण्याची मुभा मला घेऊ द्या. मी आपणहून राजीनामा दिला नाही. मला चक्क डच्चू देण्यात आलेला आहे. कसे झाले तरी मी दुसऱ्या दिवशी राजीनामा देऊन मोकळा झालो असतो, हे खरे आहे पण त्यामुळे परिस्थितीत काही फरक पडत नाही. शेवटी, गचांडी ती गचांडीच!**

**बिग इगोज, स्मॉल मेन**

**लेखक : राम जेठमलानी** **अनु.: माधव मोर्डेकर**

**किंमत :८० रु.**




जेमिनी कडू यांनी उद्घाटन केले. राज्य सहकारी बँकेचे संचालक नानासाहेब देशमुख अध्यक्षस्थानी होते. टी. आर. जाधव, नेताजी गोरे आणि आर. आर. खडके या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

'संत साहित्यातील विद्रोही तुकाराम' या विषयावर बापूराव महाराज परतूरकर यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद घेण्यात आला. किशोर घोरपडे व प्रा. बसवराज कोरे यांनी या परिसंवादात भाग घेतला.

प्रा. जयराम खेडेकर यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलन झाले प्रा. डॉ. एस. एस. भोसले यांनी परिषदेच्या स्थापनेमागील भूमिका विशद केली.

**अपारंपरिक शिक्षण व्यवस्थेची गरज : प्रा. प्रधान**

''शिक्षण व्यवस्था खऱ्या अर्थाने अपारंपरिक झाली, तर त्याद्वारे निर्माण होणारे विद्यार्थी नव्या जगाचे आशास्थान ठरतील,'' असे मत ज्येष्ठ समाजवादी नेते प्रा. ग. प्र. प्रधान यांनी पुणे येथे व्यक्त केले.

महाराष्ट्र आचार्य कुलाचे संस्थापक मामा क्षीरसागर प्रतिष्ठानतर्फे आयोजित केलेल्या शिक्षण पुरस्कार समारंभात प्रधान यांच्या हस्ते ज्येष्ठ लेखिका लीलावती भागवत यांनी लिहिलेल्या 'मामा क्षीरसागर जीवनयात्रा' या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. श्रीमती भागवत यांच्या हस्ते चिखलगाव (जि. रत्नागिरी) येथील रेणू दांडेकर यांना 'आचार्य', पारशिवणी (जि. नागपूर) येथील ज्ञानदेव निकम यांना 'शिक्षणयोगी', कोल्हापूर येथील सुचिता पडळकर यांना 'मातृधर्मी' आणि पुण्यातील पु.ग. वैद्य यांना 'शिक्षण प्रबोधिनी' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

प्रा. प्रधान म्हणाले, ''आजूबाजूला घडत असलेल्या घटनांनी अनेकदा मन विषण्ण होते. अशा वेळी काही तरुण ध्येयवादाने प्रेरित होऊन वाटचाल करताना पाहिले, की मनावर दाटलेले मळभ दूर होते. मामा क्षीरसागर, विनोबा भावे, साने गुरुजी ही खरी ऋषितुल्य व्यक्तिमत्त्वे होती. मामांचे जीवन लामणदिवा हातात घेतलेल्या सुवासिनीच्या चित्रासारखे होते. आपले जीवन प्रकाशमान करण्याचे कर्तृत्व त्यांच्यामध्ये होते.'' आपल्याकडे शिक्षण व्यवस्था खऱ्या अर्थाने अपारंपरिक पद्धतीची सुरू झाली पाहिजे, असे सांगून ते म्हणाले, ''मुक्तशाळा, मुक्तविद्यापीठ, अनौपचारिक व निरंतर शिक्षणपद्धती अधिक प्रभावी ठरते. त्याचे निरनिराळ्या भागांत सुरू असलेले प्रयोगही मोलाचे ठरले आहेत. या शिक्षण पद्धतीतून घडविला जाणारा विद्यार्थी नव्या जगाचे आशास्थान ठरेल.''

ग्रंथ प्रकाशित केल्याबद्दल नवीन उद्योग प्रकाशनचे नवीन इंदलकर यांचा, तसेच 'गांधी विचार मीमांसा'चे संपादक जयवंत मठकर यांचा सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र आचार्य कुलाचे प्रतिनिधी अविनाश पितळे यांनी सूत्रसंचालन केले. घळसासी यांनी आभार मानले.

**'राजा शिवछत्रपती'चे प्रकाशन**

आयडियल, दै. लोकसत्ता आणि पुरंदरे प्रकाशन यांच्या वतीने शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे लिखित 'राजा शिवछत्रपती' या ग्रंथाच्या १४ व्या आवृत्तीचे प्रकाशन १ एप्रिल रोजी दादरच्या वनमाळी सभागृहात मनोहर जोशी यांच्या हस्ते झाले. शिवसेना नेते राज ठाकरे हे ही उपस्थित होते.

कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न करता केवळ शब्दासाठी आपल्या प्राणांची बाजी लावणारे मावळे छत्रपती शिवरायांना भेटले म्हणूनच ते इतिहास घडवू शकले. मात्र यापुढे इतिहास घडण्याची शक्यता नाही, कारण शिवजयंतीच्या दिवशी ज्योत घेऊन जाणारेच सध्या गडाची उंची कमी करीत आहेत, अशी खंत प्रा. शिवाजीराव भोसले यांनी मुंबई येथे व्यक्त केली.

'राजा शिवछत्रपती' या ग्रंथाचे वाचन सत्याचा वेध घेण्याच्या हेतूने करावे, शिवरायांना बरे-वाईट, स्वकीय-परकीय, स्वराज्य-बादशाही यातील फरक कळत असल्यानेच ते राजकीय प्रबोधनकार होते. त्यामुळे त्यांचे चरित्र हे जीवनसत्त्व म्हणून अंगिकारले पाहिजे, असेही प्रा. भोसले म्हणाले.

बाबासाहेब पुरंदरे यांनी या पुस्तकाचे लेखन केलेले नाही तर ते कथन आहे. पुस्तक वाचताना डोळ्यापुढे 'जाणता राजा' उभा राहतो. त्यांनी शिवरायांवर चित्रपट काढला तर आपण त्यांच्या पाठीशी 'सह्याद्री'प्रमाणे उभे राहू, असेही मनोहर जोशी म्हणाले.

'शिवसृष्टी' निर्माण करावी हे आपले स्वप्न होते. ते काम मनोहर जोशी यांनी मुख्यमंत्री असताना पूर्ण केले. त्यांनी २१ एकर जमीन शिवकार्यासाठी दिली आहे, असे शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे म्हणाले. शिवसेना नेते राज ठाकरे यांनी, या ग्रंथातील दीनानाथ दलाल यांच्या चित्रांमुळे स्वत: ग्रंथाकडे आकर्षित झाल्याचे सांगितले. सूत्रसंचालन सुधीर गाडगीळ यांनी केले तर आयडियलचे मंदार नेरुरकर यांनी आभार मानले.

### कोऱ्हाळकरांची कविता पोएट्री डॉट कॉमवर

दी इंटरनॅशनल लायब्ररी ऑफ पोएट्री या संस्थेने पोएट्री डॉट कॉम या वेबसाईटवर आंतरराष्ट्रीय पातळीवरील खुल्या काव्यलेखन स्पर्धेचे आयोजन केल्याचे समजताच पुण्याचे ॲड. चंद्रशेखर कोऱ्हाळकर यांनी 'पोएट्री डॉट कॉम' या वेबसाईटवर कविता पाठविली. ॲड. कोऱ्हाळकर यांची कविता स्पर्धेच्या उपांत्यफेरीत सरळ पोचल्यामुळे स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी पात्र ठरली आहे. अंतिम फेरीत या कवितेला एक हजार डॉलरचा पुरस्कार मिळू शकेल.

''ही मूळ कविता फार मोठी आहे. स्पर्धेत पाठविताना मी स्वत: ती संपादित केली. भौतिक सुखामागे धावताना, जीवनातील निखळ आनंद, निवांतपणा, संवेदनशीलता जग गमावत आहे. जीवन हरवून बसलेल्या माणसांना पुन्हा तिकडे नेण्यासाठी काय करावे, हे मी या कवितेतून मांडले आहे. निसर्गाच्या सान्निध्यात जे सुख आहे, त्याचे महत्त्व सांगतानाच निसर्गाचे शब्दचित्र मी या कवितेतून रेखाटले आहे.''


**लक्षपूर्वक वाचा...**

**यामुळे आपण पुढील नवीन स्पर्धा जिंकू शकाल...**

**मला शाळा सोडायला लावण्याची त्याची जिद्द त्यानं सोडून दिली होती नि मला कुठंतरी असं बोलून शरणागतसारखं गोंजारत होता.... मला ते आवडेना. जन्मभर रगीनं जगू बघणाऱ्या दादानं असं मऊ मांजरासारखं माझ्यासमोर वागायला नको, असं वाटलं... 'दादा, तू असं शिंग मोडलेल्या बैलागत गरीब होऊ नगं. माझ्या बाबतीत का होईना, पर माझा बा असा झालेला मला न्हाई खपायचं.'**

**झोंबी**

**लेखक : आनंद यादव किंमत : 225 रु.**


### सर्वंकष सांस्कृतिक धोरण राज्य सरकारने तयार करावे– टिकेकर

साहित्य-कलांसह सर्वच क्षेत्रांत महाराष्ट्राची गेल्या तीन दशकात झालेली घसरण रोखण्यासाठी सर्वंकष सांस्कृतिक धोरण राज्य सरकारने तयार करायला हवे, अशी अपेक्षा दैनिक 'लोकसत्ता'चे संपादक डॉ. अरुण टिकेकर यांनी पुणे येथे व्यक्त केली.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. यु. म. पठाण व विचारवंत लेखिका डॉ. नलिनी पंडित यांना १९९९-२००० साठी तर ज्येष्ठ साहित्यिक शंकरराव खरात व 'मृत्युंजय'कार शिवाजी सावंत यांना २०००-२००१ या वर्षासाठीची गौरववृत्ती डॉ. टिकेकर यांच्या हस्ते देण्यात आली.

शाल, मानपत्र आणि २५ हजार रुपये असे या गौरववृत्तीचे स्वरूप आहे. राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री प्रा. रामकृष्ण मोरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमासाठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष प्रा. रा. ग. जाधव, साहित्य-संस्कृती मंडळाचे अध्यक्ष रा. रं. बोराडे, प्रा. डॉ. सदानंद मोरे, प्रा. पुष्पा भावे, राज्यमंत्री विमल मुंदडा, मंडळाचे प्रभारी सचिव उ. बा. सूर्यवंशी व्यासपीठावर उपस्थित होते.

गौरववृत्ती देण्यात आलेले सर्वच विचारवंत, ज्या काळात महाराष्ट्र सर्वच क्षेत्रात अग्रेसर होता, अशा १९७० च्या दशकातील आहेत, असे सांगून डॉ. टिकेकर म्हणाले की, या दशकानंतरच्या काळात मात्र सर्वच क्षेत्रात हळूहळू घसरण होत गेली आहे. या पुढील काळात गौरववृत्ती देण्यासाठी तरी त्या योग्यतेची माणसे असतील की नाही, हा विचार करण्याची वेळ येणार आहे. त्यामुळे आजवर झालेल्या या घसरणीबाबत केवळ सरकारच नव्हे तर सर्वच समाजघटकांनी विचार करायला हवा. ज्येष्ठ लेखक, विचारवंतांचे आपणही काही देणे लागतो, यासाठीची काही व्यवस्था समाजानेही निर्माण करायला हवी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

सामाजिक घसरण होत जाते तेव्हा साहित्यकला बहराला येतात, असे सांगून डॉ. टिकेकर म्हणाले की, घसरण झालेली असली तरी हा साहित्य-कलांचा बहर मात्र आल्याचे दिसत नाही. सध्या प्रचलित असलेल्या सर्वच व्याख्यांचा, संकल्पनांचा पुनर्विचार करण्याची आता गरज आहे. विचारवंत कुणाला म्हणायचे आणि त्याची विधायक व्याख्या कशी करता येईल, याचा विचार या पुढील काळात तरी करायला हवा. राज्याचे सर्वंकष सांस्कृतिक धोरण तयार झाले की, शिवजयंती वा फायरसारख्या चित्रपटांसारखे पुन्हा पुन्हा उद्भवणारे वाद कायमचे संपवून या विषयाकडे गांभीर्यपूर्वक पाहता येईल. ते होण्यासाठी सर्वंकष सांस्कृतिक धोरण तयार करतानाच समाजालाही अधिक गंभीर बनवण्याची आवश्यकता आहे. एकीकडे सारे जग अवघडातून अधिक अवघडाकडे जात असताना आपण मात्र सोप्याकडून अधिक सोप्याकडे चाललो आहोत. राज्यकर्त्यांनी विचारवंतांकडे पाहण्याची वृत्ती बदलायला हवी. ती सुरुवात मोरे यांनी केली आहे. ती तशीच चालू राहायला हवी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्ती केली.

मराठीतील उत्तम साहित्य वा कलाकृती केवळ भाषाभिमानामुळे मराठीपुरत्या मर्यादित राहणे मराठीच्या हिताचे नाही त्या इंग्रजीतून जगभर जायला हव्यात, अशी अपेक्षा मोरे यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्राच्या साहित्यिक, सामाजिक जीवनात आपल्या लेखणी व विचारांद्वारे समृद्धी आणलेल्या लेखक, विचारवंतांबद्दल समाजाच्या वतीने, राज्याच्या वतीने कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा कार्यक्रम आहे, असे प्रा. मोरे म्हणाले.

वैज्ञानिक प्रगती कितीही झाली तरी मराठी भाषा मरणार नाही, असे मत शिवाजी सावंत यांनी व्यक्त केले. सरकारचा हा सत्कार म्हणजे मायमराठीने पाठीवर फिरवलेला मायेचा हात आहे, असे ते म्हणाले.

कारकिर्दीत व लेखनवाटचालीत गुरू गं.बा. सरदार यांचे योगदान मोठे होते त्यामुळे गौरववृत्ती स्वीकारताना त्यांची प्रकर्षाने आठवण होते, अशी भावना नलिनी पंडित यांनी व्यक्त केली.

विविध धर्मीयांमध्ये आपल्याला उदात्त जीवनमूल्यांचे दर्शन घडले आणि त्यांच्या सहकार्यामुळेच आपल्याला आनंददायी लेखन सतत करत राहावेसे वाटले, असे पठाण यांनी म्हटले.

प्रकृतिअस्वास्थ्यामुळे खरात कार्यक्रमास उपस्थित राहू न शकल्याने त्यांचे चिरंजीव रवी खरात यांनी गौरववृत्ती स्वीकारली.

**सत्याच्या रक्षणासाठीच लेखणी वापरायला हवी : कमलेश्वर**

''लेखकाने सत्याच्या रक्षणासाठीच, लेखणी वापरायला हवी. संस्कृतीसाठी व समतेसाठी शब्दांसह चाललेल्या संघर्षात लेखकाने करुणेच्या परंपरेचे पाईक असायला हवे,'' असे ज्येष्ठ साहित्यिक कमलेश्वर यांनी पुणे येथे सांगितले.

प्रतिमा प्रकाशनातर्फे कमलेश्वर यांच्या 'कितने पाकिस्तान' या कादंबरीचा पद्माकर जोशी यांनी केलेला 'किती पाकिस्तानं?' हा अनुवाद डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर यांच्या हस्ते प्रकाशित झाला.

अंत:करणात धर्माविषयीची आस्था असेल, तर तेथे धर्मांधतेला स्थान उरत नाही, असे सांगून, कमलेश्वर म्हणाले, ''धर्म महत्त्वाचा आहे आणि धर्मांधतेइतकी नीच गोष्ट कोणतीही दुसरी नाही. महात्मा गांधीजींहून दुसरा मोठा हिंदू कुणी नाही, पण गांधीजींना कधी मंदिरात


लक्षपूर्वक वाचा...

यामुळे आपण पुढील नवीन स्पर्धा जिंकू शकाल...

**''जोपर्यंत स्त्रिया देण्यापेक्षा घेण्याच्याच अवस्थेत असतील, तोपर्यंत त्या अन्याय सहन करून राहतील. चाकोरीबाहेर जाऊन ज्या स्त्रिया अपारंपारिक आणि खडतर स्थानांवर पोहोचतात, त्यांना अधिकार मिळतात. अशा स्त्रिया निवड करतात, त्याग नव्हे.''**

**आय डेअर**

**लेखिका : किरण बेदी** **अनु.: आशा कर्दळे**

**किंमत : २०० रु.**




अगर कुंभमेळ्यात जाण्याची गरज भासली नाही. कुंभमेळ्यात जाऊन धर्माविषयीची आस्था दाखवण्याची गरज सोनिया गांधी यांच्यासारख्यांना वाटते. धर्म कधीही मंदिरात जा म्हणत नाही, माणसाकडे जा म्हणून सांगतो.''

या देशात केवळ चर्चाच फार होते; परिवर्तन काहीच घडत नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. आपली ५५ वर्षांची लेखनयात्रा आस्था-अनास्था, विश्वास-अविश्वास यांवरच चालली, आपली भाषा, संस्कृती हाच ईश्वर असतो; पण सध्या या दृष्टीने समाजाचे ईश्वरविहीन अस्तित्व आहे. आपल्या देवतांमध्येही परस्परांत संवाद नाही, त्यांना मित्र नाहीत. देवता एकाकी, एकलकोंड्या आहेत. त्या ऐवजी आपल्याला संवादाची संस्कृती सुरू करायची आहे, असेही त्यांनी सांगितले.

अनुवादक श्री. जोशी म्हणाले, ''अनुवाद करताना मी स्वत:च लिहितो आहे, असे वाटते. ते ते लेखक त्यांच्याच शैलीत मराठीत लिहीत आहेत, असा मी विचार करतो, 'कितने पाकिस्तान' या पुस्तकाचा अनुवाद करताना मी अस्वस्थ होतो. झपाटल्यासारखा अनुवाद करीत होतो.''

डॉ. रामजी तिवारी व डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांची भाषणे झाली. 'प्रतिमा' प्रकाशनचे अरुण पारगावकर यांनी स्वागत केले व प्रा. पद्मजा घोरपडे यांनी सूत्रसंचालन केले.

**चित्रविचित्र स्वभावाची अनेक माणसे मला भेटली**

साहित्य कलायात्रीतर्फे वपु काळे व प्रसिद्ध व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर यांच्या गप्पांचा कार्यक्रम पुणे येथे १५ एप्रिल रोजी झाला. कथा सुचण्यामागील घटना वा प्रसंग, त्यावर वाचकांच्या येणाऱ्या मार्मिक प्रतिक्रिया, वाचक व श्रोत्यांचे आलेले गमतीदार अनुभव सांगत वपुंनी ही मैफल रंगवली.

तरुणाईचा किस्सा सांगताना वपु म्हणाले, ''कुणी वाकून नमस्कार केलेला मला आवडत नाही. एकदा नाशिकच्या कार्यक्रमात एक तरुण मला वाकून नमस्कार करण्याचा प्रयत्न करीत होता. तीन-चार प्रयत्नांनंतर तो यशस्वीही झाला. त्याच्या त्या वृत्तीचं मला औत्सुक्य वाटलं. मात्र, काही दिवसांतच त्याच्या आलेल्या पत्रानं मी उडालोच. त्यानं लिहिलं होतं, की तुम्ही नेहमी आम्हा तरुणांच्या फॅशनबाबत हेटाळणीपूर्वक उल्लेख करता. त्यामुळं तुमच्या पँटचा बॉटम नेमका किती, हे पाहण्यासाठी मी तुम्हाला वाकून नमस्कार केला. या किश्शाने श्रोतृवर्गात हास्याची कारंजी उसळली.

'गार्गी', 'भांडणारा जोशी', 'करंजी', 'भदे' आदी कथांच्या कल्पना कशा सुचल्या, यावर वपु म्हणाले, ''चित्रविचित्र स्वभावांची अनेक माणसं मला आयुष्यात भेटली. त्यांच्या स्वभावमिश्रणातून मी या व्यक्तिरेखा साकारल्या. 'भदे' ही कथा मला माझ्या आईवरून सुचली. अंगात ताप असतानाही बोरिवलीला कथाकथनासाठी मी चाललो होतो. तेव्हा मोठ्या मायेनं आई म्हणाली, मी कधी तुला काही दिलं नाही. तुझा ताप मी घेतला असता, तर तुझा कार्यक्रम पार पडायला तरी मदत झाली असती. तिच्या या एका वाक्यानं डोक्यात कथेचं बीज शिरलं आणि रेल्वे बोरिवली स्थानकावर येईपर्यंत मनात कथा पूर्ण तयार झाली होती.''

''कथा-कादंबऱ्यांबरोबरच केवळ संवादांवर आधारित 'संवादिनी' या पुस्तकाचा प्रयोग करून पाहिला. त्याला वाचकांची चांगली पसंती मिळाली. ज्येष्ठ नाटककार वसंत कानेटकर

यांनीही त्याला दाद दिली. 'तूच माझी वहिदा' ही रसिकप्रिय कथा त्यांनाही खूप भावली होती. त्यावर त्यांनी तीन अंकी नाटकही तयार केलं. मीही त्या कामी मदत केली. या नाटकाचा तिसरा अंक मात्र फारसा चांगला वठला नसल्याचं काही दिग्दर्शकांचं मत पडलं. निर्मात्याअभावी शेवटपर्यंत ते रंगमंचावर येऊ शकलं नाही.''

''लेखनाबरोबरच काही काळ रंगमंचाचाही अनुभव घेतला. 'आंधळ्याच्या गायी' या नाटकात नटश्रेष्ठ नानासाहेब फाटक व केशवराव दाते अशी दिग्गज माणसं होती. त्यामुळं दुय्यम भूमिका असूनही त्या नाटकातील भूमिका स्वीकारली. त्या श्रेष्ठ अभिनेत्यांचा सहवास त्या निमित्तानं लाभला. तसाच प्रसंग पुलंबरोबरच्या मुंबईतील सलग दोन दिवस झालेल्या कार्यक्रमांचा. पुलंच्या वाढदिवसाचा आनंद एका डोळ्यांत, तर अरुण देशपांडेसारख्या जीवलगाच्या दु:खाचे अश्रू दुसऱ्या डोळ्यात, या अवस्थेत कार्यक्रमांचं सूत्रसंचालन मी केलं. सर्वाधिक आनंदमयी आणि सर्वाधिक दु:खद क्षण एकाच वेळी अनुभवण्याचा माझ्या जीवनातला तो सर्वांत अविस्मरणीय प्रसंग. सर्व विद्यमान साहित्यिक एकत्र केले तरी पुलंच्या साहित्याची उंची त्यापेक्षा अधिक ठरते.'' या त्यांच्या उत्तराने श्रोत्यांमध्ये खसखस पिकली. ज्येष्ठ साहित्यिक वसंत बापट यांच्या 'मैफल सुरू राहू द्या, जाणारच कि वो आमी कवातरी पटदिशी' या लावणीतील ओळी म्हणून वपुंनी गप्पांची सांगता केली.

### महात्मा फुले यांचे 'तृतीय रत्न' मराठी रंगभूमीवर झळकरणार!'

*आता तरी तुम्ही मागे येऊ नका । धि:कारुनि टाका । मनूमंता ।*
*विद्या शिकताच । पावाल ते सुख । घ्यावा माझा लेख । जोती म्हणे ।।*

तत्कालीन प्रस्थापित ब्राह्मणी व्यवस्थेविरुद्ध आपल्या लेखणीचा आसूड ओढणारे द्रष्टे समाज सुधारक महात्मा जोतीराव फुले यांनी 'अखंडा'मधून शिक्षणाची अशी महती गायलीच. पण १८५५ साली लिहिलेल्या 'तृतीय रत्न' या नाटकातूनही बहुजन समाजाची मुक्ती शिक्षणातच सामावली असल्याचे विधान केले होते. त्यांचे हे नाटक आजतागायत रंगभूमीवर संपूर्णपणे होऊ शकलेले नाही. मराठीतील आद्य नाटककाराचे हे रंगभूमीच्या इतिहासातील पहिले स्वतंत्र सामाजिक नाटक मूळाबरहुकूम प्रेक्षकांपुढे न येण्याची उणीव आता दूर होणार आहे. अलीकडे अंध कलाकारांना घेऊन पुलंचे 'तीन पैशांचा तमाशा' हे नाटक सादर करणारे नाट्यदिग्दर्शक स्वागत थोरात हे आपल्या 'यशोगाथा' या संस्थेतर्फे आणि 'सेवा प्रबोधिनी' या सामाजिक संस्थेच्या सहकार्याने 'तृतीय रत्न' रंगभूमीवर आणत आहेत. ११ एप्रिल रोजी, महात्मा फुले यांच्या जन्मदिनी दादरच्या छबिलदास शाळेत या नाटकाचा मुहूर्त केला गेला.

एका गरीब कुणबी जोडप्यास ग्रहांचा धाक दाखवून आणि काल्पनिक अरिष्ट उभे करून सर्व बाजूंनी ब्राह्मण कसा लुबाडतो आणि एक पाद्री त्यांना शिक्षणाचा मार्ग दाखवतो, असे कथानक असलेल्या या नाटकात विदूषकाचे पात्र निर्माण करून फुल्यांनी नाटकाची जाण तर दाखवली आहेच, पण त्याच्याकरवी समाजातील दंभ उघडे केले आहे.

या नाटकात प्रमोद पवार, राहुल सोलापूरकर, हृषिकेष जोशी, अनंत रे, यशवंत विश्राम, शुभांगी फावडे-लाटकर, शैलजा सावंत आणि अन्य २५ कलावंतांचा सहभाग असणार आहे.


## लक्षपूर्वक वाचा...
## यामुळे आपण पुढील नवीन स्पर्धा जिंकू शकाल...

**युक्तीवाद करणे शक्य झाले नाही की ही मंडळी एकदम दुसऱ्यांच्या शीलावर शिंतोडे उडवतात, अपशब्द वापरतात, इतरांच्या मतात तथ्य नाही म्हणतात, थुंकतात, पळ काढतात परंतु त्यांना नुसते पुरावे द्या, म्हटले की त्यांना पराकोटीचा राग येतो. आमच्यावर वैयक्तिक हल्ले होत आहेत असा ओरडा ते करतात. 'असंस्कृत हल्ला' अशी किंकाळी फोडतात.**

**ख्यातनाम इतिहासकार**

**लेखक : अरूण शौरी** **अनु.: सुधा नरवणे**

**किंमत : १५० रु.**




### जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतही संस्कृती रुजण्याची नितांत गरज

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आपल्या संस्कृतीची पाळेमुळे घट्ट रुजविली नाहीत; तर देशाच्या अखंडत्वाला धोका निर्माण होऊ शकतो, असे प्रतिपादन 'महाराष्ट्र टाइम्स'चे कुमार केतकर यांनी पुणे येथे केले.

पत्रकार कामिल पारखे यांनी संकलित केलेल्या महाराष्ट्र चरित्रकोशाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. पुणे पत्रकार प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजीव साबडे अध्यक्षस्थानी होते. प्रतिष्ठानच्या मदतीने श्री. पारखे यांनी हा उपक्रम केला आहे. इ. स. १८०० ते २००० या काळातील महाराष्ट्रातील प्रमुख व्यक्तींचा समावेश असलेला हा चरित्रकोश सुनीती प्रकाशनने प्रसिद्ध केला आहे. पराग रबडे यांनी कोशाची माहिती दिली.

'आपल्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रांतील प्रसिद्ध व्यक्तींच्या चरित्रांचा एकत्रित संग्रह असणे गरजेचे बनले आहे,'' असे सांगून केतकर म्हणाले, ''जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे आपली संस्कृती लयाला जाईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. आपल्या संस्कृतीची पाळेमुळे घट्ट करणाऱ्या सर्व उपक्रमांना म्हणूनच महत्त्व आहे. तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे जगभरातील मराठी माणसे आणखी जवळ आली आहेत. हा मराठी समुदाय बळकट करण्यासाठी अशा प्रकारचे उपक्रम व्हायला हवेत. समुदाय बळकट झाला नाही तर समाज बळकट होत नाही आणि त्यामुळे देशाच्या एकतेला धोका निर्माण होतो.''

''जागतिकीकरणाच्या सध्याच्या काळात आपल्या संस्कृतीची समृद्धी हा चरित्रकोश उलगडून दाखवितो,'' असे श्री. साबडे यांनी सांगितले. पत्रकारितेची व्याप्ती आणि आवाका वाढल्याने चरित्रकोश पत्रकारांना उपयुक्त ठरेल, असेही त्यांनी नमूद केले.

### करवीर नगर वाचन मंदिर, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय यांना उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार

राज्य सरकारचे दरवर्षी दिले जाणारे डॉ. आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार जाहीर झाले असून शहरी विभागात कोल्हापूरच्या करवीर नगर वाचन मंदिराला पंचवीस हजार रुपयांचा प्रथम तर मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या काळाचौकी शाखेला पंधरा हजारांचा द्वितीय पुरस्कार जाहीर

झाला आहे. दहा हजार रुपयांच्या तृतीय पुरस्काराचे मानकरी विरार पश्चिम येतील विठ्ठल संस्थान गीता ग्रंथालय ठरले आहे.

नासिकच्या अण्णासाहेब मुरकुटे अभ्यासिका व सार्वजनिक ग्रंथालयाची चौथ्या क्रमांकाच्या पुरस्कारासाठी निवड झाली असून हा पुरस्कार पाच हजार रुपयांचा आहे. सार्वजनिक ग्रंथालयांची गुणवत्ता वाढविण्यासाठी तसेच ग्रंथालय चळवळीला गती येण्यासाठी राज्य सरकारतर्फे हे पुरस्कार देण्यात येतात.

उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक यांना दिले जाणारे डॉ. एस. आर. रंगनाथन ग्रंथमित्र पुरस्कारही जाहीर करण्यात आले असून अनुक्रमे भास्कर बाळकिसनराव आर्वीकर (उस्मानपुरा, औरंगाबाद) आणि केशवराव अमृतराव कोतवाल (सार्वजनिक वाचनालय चांदवड) पुरस्कारप्राप्त ठरले आहेत. पाच हजार रु. अशी या पुरस्काराची रक्कम आहे.

ग्रामीण भागात प्रथम क्रमांकासाठी कोणतेही ग्रंथालय पात्र ठरले नसल्याने हा पुरस्कार देण्यात आलेला नाही. द्वितीय क्रमांकाचा (१५ हजार रु.) पुरस्कार औरंगाबाद जिल्ह्यातील सिल्लोडच्या दादासाहेब अन्वीकर स्मारक ग्रंथालयाला देण्यात आला आहे. तृतीय क्रमांकाचा दहा हजार रुपयांचा पुरस्कार पुणे जिल्ह्यातील आंबेगाव, चांडोली येथील श्री कान्होबा सार्वजनिक वाचनालयाला तर चौथ्या क्रमांकाचा पाच हजार रुपयांचा पुरस्कार अमरावतीच्या वरुड तालुक्यातील गाडेगावच्या गुरुदेव सार्वजनिक वाचनालयाला मिळाला आहे.

ग्रामीण भागातील उत्तेजनार्थ ग्रंथालय पुरस्कार पुणे जिल्ह्यातील जुन्नर येथील जुन्नर नगर वाचनालयाला (२५ हजार रु.), सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील नागोजीराव पाटणकर वाचनालयाला व अकोल्याच्या रणपिसे नगर येथील सम्यक संबोधी वाचनालयाला (दहा हजार रु.) मिळाला आहे. पुरस्कार वितरण समारंभाची तारीख व स्थळाची घोषणा राज्याचे ग्रंथालय


**लक्षपूर्वक वाचा...**

**यामुळे आपण पुढील नवीन स्पर्धा जिंकू शकाल...**

**आपल्या गुडघ्यांना विळखा घालून स्वप्नाळू डोळ्यांनी आकाशाकडे नजर लावत ती पटकन बोलून गेली,**

**'मला माझ्या आयुष्यात नेमकं काय हवंय, ते आता कळलं'**

**काय हवं असेल या मुलीला? ....मी मोठ्या अपेक्षेने तिच्याकडे पाहत राहिले.**

**क्षणभराने माझ्या नजरेत नजर रोखून ती म्हणाली,**

**'आय वॉन्ट टु बी फेमस ! दॅट्स इट !!**

**प्रसिद्धीच्या मोहापायी आख्ख आयुष्य बरबाद करून घेणाऱ्यांची इतकी उदाहरणं डोळ्यासमोर असताना शेवट नसलेल्या त्याच वाटेवर पाय ठेवण्याची हिंमत या कोवळ्या मुलीमध्ये कुठुन येते कोण जाणे !**

**सिलेक्टिव्ह मेमरी**

**लेखिका :शोभा डे** **अनु.: अपर्णा वेलणकर**

**किंमत : ३३० रु.**




संचालक लवकरच जाहीर करतील.

**रणजित देसाईंच्या कादंबऱ्या सांस्कृतिक दस्तऐवज : राजाध्यक्ष**

''रणजित देसाई एकाच वेळी वर्तमानकाळ आणि भूतकाळ अशा दोन वाटांवरून जाणारे लेखक होते. त्यांच्या कादंबऱ्या हा सांस्कृतिक दस्तऐवज आहे,'' असे प्रतिपादन इंदूरच्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. सौ. विजया राजाध्यक्ष यांनी कोल्हापूर येथे केले.

मेहता पब्लिशिंग हाऊस फाऊंडेशन पुरस्कृत 'स्वामी'कार रणजित देसाई पुरस्कारांचे वितरण सौ. राजाध्यक्ष यांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या. शाहू स्मारक भवनात झालेल्या समारंभाच्या अध्यक्षस्थानी फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. आनंद यादव होते. कथासंग्रह, कादंबरी व अनुवादासाठी अनुक्रमे श्रीनिवास विनायक कुलकर्णी (कोरडी भिक्षा), रंगा मराठे (फॅक्टरी गेट), आणि लीना सोहोनी (आय. सी. ८१४ अपहरणाचे १७३ तास) यांना पुरस्कार देण्यात आले.

''रणजित देसाई हे आपले अत्यंत आवडते लेखक आणि बंधुतुल्य मित्र होते'' असे सांगून

**डावीकडून- अनिल मेहता, आनंद यादव, श्रीनिवास कुलकर्णी, रंगा मराठे, लीना सोहोनी, डॉ.विजया राजाध्यक्ष**

श्रीमती राजाध्यक्ष म्हणाल्या, ''आम्हा समकालीन मित्रांच्या कोल्हापूरात गप्पांच्या मैफिली रंगायच्या. त्या मैफिलींचे बादशहा रणजित देसाई असायचे. त्यांच्या अनेक छंदांचा आम्हाला परिचय झाला. गप्पा मारता मारता ते संगीताच्या दुनियेत शिरायचे. चित्रकला, शिकारीबद्दल बोलायचे. सर्वसमावेशक, सर्वांगीण जीवनावर आणि निसर्गावर प्रेम करणारे असे ते लेखक होते. त्यांच्या मनात वर्तमानकाळाबरोबर सतत भूतकाळ वावरत असायचा. भूतकाळाचे सान्निध्य त्यांना प्रिय होते, त्यातूनच त्यांनी ऐतिहासिक कादंबऱ्या आणि उत्तमोत्तम ऐतिहासिक कथा लिहिल्या. त्याचबरोबर सत्यकथेतून वर्तमानाला भिडणाऱ्या आणि परंपरेचे संचित लाभलेल्या ग्रामीण कथा लिहिल्या. वर्तमानकाळाशी नाते जोडत राहण्याचे भान 'स्वामी'नंतरही कायम होते. म्हणूनच कातळ, माझा गाव, समिधा ही पुस्तके आली.''

डॉ. आनंद यादव म्हणाले, ''पुढील वर्षापासून मेहता पब्लिशिंग हाऊस फाऊंडेशनतर्फे पुण्यात कमलाबाई ओगले यांच्या नावाने ग्रंथ पुरस्कारांची योजना राबविण्यात येणार आहे.''

श्रीनिवास विनायक कुलकर्णी, रंगा मराठे आणि सौ. लीना सोहोनी यांचीही भाषणे झाली. प्रास्तविकात श्री. अनिल मेहता म्हणाले, ''रणजित देसाई यांचे आमच्याशी नाते लेखक-प्रकाशक असे नव्हते, तर ते आमच्या कुटुंबियांपैकीच होते.'' नीता गद्रे यांनी सूत्रसंचालन केले.

### ज्ञानकोशकार केतकरांच्या समाधीचा जीर्णोद्धार

महाराष्ट्रातल्या समृद्ध कोश परंपरेचे उद्‌गाते ज्ञानकोशकार श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्या पुण्यातील समाधीचा जीर्णोद्धार करण्यात येणार आहे. त्यासाठी महापालिकेची रीतसर अनुमती घेण्यात येणार आहे.

केतकर यांची १२ एप्रिलला ६४ वी पुण्यतिथी होती. त्यानिमित्ताने झालेल्या कार्यक्रमात श्री. हेमंत इनामदार यांनी समाधीच्या जीर्णोद्धाराची कल्पना मांडली. त्यास सर्वांनी संमती दिली.

डॉ. केतकर यांची पहिली समाधी दि. के. बेडेकर यांच्या पुढाकाराने बांधण्यात आली होती. या समाधीमध्ये केतकर यांच्या काही अस्थी ठेवण्यात आल्या होत्या. पण आता या समाधीचा रंग उडाला असून फरशाही फुटल्या आहेत.

### पंजाबराव देशमुखांच्या स्मृत्यर्थ : शंभर वाचनालये उघडणार

शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नावाने शंभर वाचनालये उघडण्याचा संकल्प विदर्भ सत्यशोधक मंडळाच्या डॉ. पंजाबराव देशमुख जन्मशताब्दी समितीने घेतला आहे.

भाऊसाहेबांना खऱ्या अर्थाने श्रद्धांजली अर्पण करायची असेल तर ज्ञानाची गंगा महाराष्ट्रातील ग्रामीण भागापर्यंत पोचली पाहिजे व त्यासाठी ग्रामीण भागात ग्रंथालये उघडली पाहिजेत, ही या वाचनालयाच्या निर्मितीमागची भूमिका आहे.

ज्या गावात वाचनालय नाही त्या गावातील सक्रिय तरुणांनी एकत्र येऊन हा ग्रंथालयाचा उपक्रम सुरू करायचा आहे. त्यासाठी सुरुवातीला लागणारा खर्च विदर्भ पंजाबराव देशमुख जन्मशताब्दी समितीतर्फे करण्यात येईल.

ग्रामीण भागातील युवकांच्या अडचणी लक्षात घेता त्यांनी फक्त एक पोस्टकार्ड टाकताच मंडळाचे सचीव स्वत: त्या गावी जाऊन संबंधित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करतील. ता.१ मे ते ता. ३० जून २००१ या कालावधीत हा शंभर ग्रंथालय निर्मितीचा संकल्प पूर्ण करण्याचे ठरविले आहे.


**लक्षपूर्वक वाचा...**

**यामुळे आपण पुढील नवीन स्पर्धा जिंकू शकाल...**

**ज्यांनी कारगिलच्या वैराण, उजाड डोंगरमाथ्यासाठी आपलं बलिदान केलं, त्यांच्यासाठी सगळे एकत्र आले. परंतु काश्मीरमध्ये गेल्या दहा वर्षांपासून रोज वीस तरी माणसं मारली जात आहेत. त्याबाबत मात्र कुणी काळजी केली नाही, करत नाही. काश्मीरमध्ये सुद्धा माणसंच मरताहेत, - की नाही?**

**कारगिलनामा**

**अनु.: नारायण अवटी** **किंमत : १२० रु.**


### वाचनातील सातत्यामुळे मन निर्मितीक्षम होते

वाचनासारखा दुसरा आनंद नाही. एवढ्याच पुरतं वाचन महत्त्वाचं नाही तर, वाचनामुळे मन निर्मितीक्षम होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ कथालेखिका आणि समीक्षिका डॉ. विजया राजाध्यक्ष यांनी केले.

दहिसर येथील विद्या प्रसारक मंडळाच्या सांस्कृतिक विभागातर्फे आयोजित पहिल्या उषा रमाकांत म्हात्रे स्मृती व्याख्यानमालेचे उद्‌घाटन श्रीमती राजाध्यक्ष यांच्या हस्ते झाले. यावेळी 'माझे वाचन व लेखन' विषयावर व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंफताना त्या बोलत होत्या.

वाचनातून वैविध्यपूर्ण वाचनाची आवड निर्माण झाली. त्यातूनच देशी आणि परदेशी साहित्याचे मुबलक वाचन झाले. हे सारेच वाचन आनंदासाठी झाले. त्यातही कविता प्रकार अधिक आवडला. गाणी आणि गझलसुद्धा ऐकायला आवडतात. मोरोपंत, ज्ञानेश्वरांच्या ग्रंथांना स्पर्श करण्यानेही वेगळा आनंद मिळतो.

आपल्या लेखनप्रक्रियेबद्दल बोलताना त्या म्हणाल्या : कथा, ललित लेखन आणि स्त्रियांचे लेखन या प्रकारांवर सध्या लक्ष केंद्रित केले आहे. लेखनाची पहिली पावलं थोरांच्या आधाराने पडली. मग स्वतंत्र वाटचाल झाली. यावेळी त्यांनी कथा कशा सुचतात ते सांगताना मोरोपंत, दुभंग अशा कथांच्या जन्मकथा सांगितल्या.

आंतरराष्ट्रीय चित्रकार प्रभाकर कोलते यांनी प्रास्ताविक केले. डॉ. वसंत पाटणकर यांनी परिचय करून दिला. प्रा. मेधाविनी कुलकर्णी यांनी आभार मानले.

### वाचनालय हे लेखकांचे माहेरच

वाचनालय म्हणजे आम्हा लेखकाचे माहेर तर ग्रंथप्रदर्शन म्हणजे रुखवत असे उद्गार ७० वर्षांचे तरुण साहित्यिक व. पु. काळे यांनी पुण्याच्या रसिक एजन्सीतर्फे ठाणे येथील वसंतराव नाईक सभागृहात भरविण्यात आलेल्या ग्रंथ प्रदर्शनाच्या उद्‌घाटनाच्या वेळी काढले. पानिपतकार विश्वास पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. रसिक साहित्यचे व्यवस्थापक योगेश नांदुरकर यांनी सर्वांचे स्वागत केले.

या प्रदर्शनात सुमारे १५० प्रकाशकांची विविध विषयांवरील सुमारे ३० हजार पुस्तके ठेवण्यात आली होती.

कथा, कादंबऱ्या, नाटके, मुलांसाठी गोष्टींची पुस्तके, धार्मिक, अध्यात्मिक ग्रंथ, ज्योतिष, संदर्भग्रंथ, कोशवाङ्‌मय, चरित्र, आत्मचरित्र, काव्य, आहार, आरोग्य, योगासने, पाकशास्त्र, शिवणकला, भरतकला, रांगोळ्या अशा विविध विषयांवरील पुस्तके या प्रदर्शनात ठेवण्यात आली होती. १८ व्या आणि १९ व्या शतकातील दुर्मिळ पुस्तकांचे खास दालन होते.

**पंजाबराव देशमुखांवरील ग्रंथांचे प्रकाशन रखडले**

ख्यातनाम कृषी व शिक्षणतज्ज्ञ डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जन्मशताब्दीनिमित्त १९९८ मध्ये राज्य शासनाने त्यांच्या जीवनकार्यावर आधारित दोन ग्रंथ प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु डॉ. देशमुख यांची जन्मशताब्दी उलटून दोन वर्षे झाली, तरीही हे ग्रंथ अद्याप प्रकाशित झालेले नाहीत.

राज्य शासनाने शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांची जन्मशताब्दी साजरी करण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक ३० सदस्यांची समिती स्थापन केली होती. तसेच ता. १८ एप्रिल १९९८ रोजी एक शासन निर्णय (जी. आर.) शासन निर्णय क्र. संकीर्ण १०९७ प्र. क्र. १९९/१३ काढून विविध उपक्रम राबविण्याचे ठरविले होते. या शासन निर्णयमाध्ये ६ व्या क्रमांकावर 'अ' आणि 'ब' बाबींमध्ये शासनाने स्वातंत्र्यसैनिक, वीर उत्तमराव मोहिते यांनी लिहिलेला, 'जागतिक कृषक क्रांतीचा विधाता : लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख (जीवन आणि कार्य)' हा ग्रंथ प्रकाशित करण्याचे ठरविले होते.

सर्वसाधारण जन्मशताब्दी वर्षात म्हणजे २७ डिसेंबर १९९८ पर्यंत हे ग्रंथ प्रकाशित व्हायला हवे होते, परंतु जन्मशताब्दी संपून दोन वर्षांपेक्षा जास्त कालखंड लोटलेला आहे, तरीही हे चरित्रग्रंथ प्रकाशित झालेले नाहीत. म्हणून काही चहाते नाराज आहेत.

**संकुचितपणा दूर करण्यासाठी वाचकांनी अनुवादित साहित्य घ्यावे**

**के. रं. शिरवाडकर यांचे मत**

''मराठी साहित्य आणि वाचकांमधील संकुचितपणाची भावना दूर करण्यासाठी जगातील विविध भाषांतील साहित्याचे अनुवाद आपल्या घरात आणायला हवेत,'' असे मत प्राध्यापक के. रं शिरवाडकर यांनी व्यक्त केले.

उत्कृष्ट अनुवादित पुस्तकाबद्दल महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे देण्यात येणारा 'कै. स. ह. मोडक पुरस्कार' यंदा मालवणच्या वनिता सावंत यांच्या 'द्वंद्व' या कथासंग्रहाला मिळाला. दोन हजार रुपये रोख व सन्मानपत्राचा समावेश असलेल्या या पुरस्काराचे वितरण करताना श्री. शिरवाडकर बोलत होते.

अनुवादित साहित्याकडे दुय्यम दर्जाच्या भावनेतून बघू नये, असे आवाहन करून ते पुढे म्हणाले, ''अनुवाद ही साहित्य क्षेत्रातील मोलीची गोष्ट आहे. प्रत्येक प्रदेशाला आपलीच भाषा, संस्कृती, कला, साहित्य हे महत्त्वाचे वाटत असते. मराठीत तर ही संकुचित भावना फारच आहे. त्यासाठी अनुवादित साहित्य हा उत्तम मार्ग आहे. देशांतर्गत साहित्याबरोबरच जगातील विविध भाषांतील साहित्याचे अनुवादही आपल्या घरी आले पाहिजेत.''

राजस्थानचे लोककथा लेखक विजयकांत देथा यांच्या कथासंग्रहाचा वनिता सावंत यांनी मराठीत अनुवाद केला आहे. या अनुवादित साहित्याबद्दल मिळालेल्या पुरस्काराविषयी श्रीमती सावंत यांनी आपल्या मनोगतातून कृतज्ञता व्यक्त केली.

या पुस्तकाच्या एक समीक्षक भारती पांडे यांनी, 'मराठी साहित्यात मोलीची भर टाकणारा कथासंग्रह,' अशा शब्दांत या पुस्तकाचे वर्णन करून ते पुरस्कारास कसे पात्र ठरले त्याची माहिती दिली. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्यवाह नंदा सुर्वे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. दीपक करंदीकर यांनी आभार मानले.


लक्षपूर्वक वाचा...

यामुळे आपण पुढील नवीन स्पर्धा जिंकू शकाल...

**'नाही बेटी, असं नसतं. पण आपल्याला असंच काही वाटतं. फरक नसला, तरी प्रत्येक रामायणात फरक दिसून येतो. दुनियेतील तमाम स्त्रियाचं फक्त एकच रामायण आहे – पुरूषांच्या हातून फसवलं जाणं आणि त्या फसवणूकीचा आयुष्यभर परिणाम भोगणं.. कोणतीही स्त्री या रामायणापासून अस्पर्श नाही. परंतू संसाराच्या भ्रमपाशात ही गोष्ट नीट ध्यानात येत नाही.'** **द्वंद्व**

**लेखक : विजयदान देथा** **अनु.: वनिता सावंत**

**किंमत : १५० रु.**


# नवी स्पर्धा

या नवीन स्पर्धेत ग्रंथजगतचा नियमित वाचक अगदी सहजपणे यशस्वी होऊ शकेल. खालील प्रश्नांची अचूक उत्तरे कळवा आणि बक्षीस मिळवा. बरोबर उत्तर पाठवणाऱ्यांपैकी लॉट टाकून येणाऱ्या पहिल्या तीन स्पर्धकांना आपल्या पसंतीच प्रत्येकी १०० रुपयांचे पुस्तक बक्षीस.

*१. ग्रंथजगतच्या कोणत्या अंकात श्री मोहन वेल्हाळ यांची मुलाखत दिली होती?*

*२. ग्रंथजगतच्या कोणत्या अंकातील सर्व पुस्तक परिचय ही शान्ता शेळके यांच्या पुस्तकांवरील होते?*

*३. ग्रंथजगतच्या कोणत्या अंकातून त्यावेळच्या फक्त 'आगामी' पुस्तकांचा परिचय दिला होता?*

*४. कोणत्या महिन्याचा अंक 'निरंजन घाटे विशेषांक' म्हणून प्रसिद्ध झाला होता?*

*५. ग्रंथजगतच्या कोणत्या अंकात फक्त लेखकांचाच परिचय दिलेला आहे?*

**मुदत १५ जून २००१ पर्यंत**

**आमचा पत्ता**

**मेहता मराठी ग्रंथजगत,** १२१६ सदाशिव पेठ, पुणे ३०.

# पुरस्कार

## म. वा. धोंड यांना चिटणीस पुरस्कार

मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने देण्यात येणाऱ्या प्राचार्य म. भि. चिटणीस पुरस्कारासाठी ज्येष्ठ समीक्षक प्रा. म. वा. धोंड यांची निवड करण्यात आली आहे. प्रा. धोंड यांच्या राजहंस प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या 'तरीही येतो वास फुलांना' या ग्रंथासाठी हा पुरस्कार देण्यात आला आहे.

मराठवाडा साहित्य परिषदेचे कार्यवाह कौतिकराव ठाले-पाटील यांनी या पुरस्काराची घोषणा केली. मराठीतील उत्कृष्ट काव्यसंग्रहासाठी देण्यात येणाऱ्या कुसुमावती देशमुख पुरस्कारासाठी मुंबईचे कवी आनंद विंगकर यांच्या 'आत्मटीकेच्या उदात्त रात्री' या काव्यसंग्रहाची निवड करण्यात आली आहे.

## राहू– केतू कादंबरीस कुरुंदकर पुरस्कार

'राहू– केतू' या कादंबरीला मराठवाडा साहित्य परिषदेचा नरहर कुरुंदकर साहित्य पुरस्कार जाहीर झाला आहे. मराठवाड्यातील लेखकाच्या ललित कृतीस किंवा समीक्षा ग्रंथास हा पुरस्कार देण्यात येतो.

औरंगाबादच्या साकेत प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या मथू सावंत यांच्या कादंबरीस यापूर्वी सरकारचा उत्कृष्ट वाङ्मय निर्मिती पुरस्कार, फुले-आंबेडकरवादी साहित्य पुरस्कार मिळाले आहेत. जिल्हा परिषदेच्या राजकारणावरील या कादंबरीचे नाट्य रूपांतरही होत आहे.

नांदेड येथील राजर्षी शाहू विद्यालयात मथू सावंत या शिक्षिका असून, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालिका आहेत.

## 'महाभारत' आवृत्तीच्या प्रकल्पासाठी भांडारकर संस्थेला ५० लाख रुपये

पुणे येथील भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूटला महाभारताची चिकित्सक आवृत्ती सीडी-रॉमवर घेण्याच्या प्रकल्पासाठी केंद्रीय सांस्कृतिक कार्यमंत्री अनंतकुमार यांनी जाहीर केलेले ५० लाख रुपये मिळाल्याची माहिती संस्थेचे मानद सचिव डॉ. मो. गो. धडफळे यांनी दिली.

भांडारकर इन्स्टिट्यूटने संशोधित केलेल्या महाभारताची चिकित्सक आवृत्ती ही जगात



सर्वत्र प्रमाणभूत मानली जाते. माहिती-तंत्रज्ञानाच्या सध्याच्या युगात ही आवृत्ती अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या आधाराने जगभरातील संशोधकांपर्यंत पोहोचावी, या हेतूनेच सीडी रॉमचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत एकूण नऊ सीडीज प्रकाशित करण्यात येणार आहेत, असेही डॉ. धडफळे यांनी स्पष्ट केले.

यापैकी पहिली सीडी प्रकाशित झाली असून दुसरी पूर्णतेच्या मार्गावर आहे. मूळ संहिता, चिकित्सक तळटीपा, उपोद्घात त्याचप्रमाणे 'हिस्टरी ऑफ धर्मशास्त्र'चे सातही खंड, डॉ. रा. ना. दांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली वैदिक संदर्भसूची (बिब्लिओग्राफी) आणि भांडारकर इन्स्टिट्यूटची १९१८ पासूनच्या वार्षिक पत्रिकेचे सर्व अंक या साऱ्यांचा अंतर्भाव सीडीजमध्ये होणार आहे, असे ते म्हणाले.

इन्स्टिट्यूटच्या आवारात ग्रंथालय, गोडाऊन व संगणक विभागासाठी बांधलेल्या इमारतीचे उद्घाटनही नजीकच्या काळात होणार आहे. पुणे विद्यापीठाच्या संस्कृत व प्राकृत भाषाविभाग प्रमुख डॉ. सरोजा भाटे यांना यूजीसीचा मानाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच वैनायकम् महाकाव्याचे रचनाकार डॉ. गं. बा. पळसुले यांचाही सत्कार करण्यात आला.

## उर्दू साहित्य अकादमीतर्फे विविध पुरस्कार

महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीतर्फे देण्यात येणारे विविध पुरस्कार सांस्कृतिक कार्यमंत्री रामकृष्ण मोरे यांनी जाहीर केले.

१९९८-९९, १९९९-२००० आणि २०००-२००१ अशा तीन वर्षांसाठीचे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. संत ज्ञानेश्वर पुरस्कारासाठी या तीन वर्षांसाठी अनुक्रमे हबीब तन्वीर (भोपाळ), बाकर मेहदी (मुंबई), काझी अब्दुल सत्तार (अलीगड) यांची निवड करण्यात आली आहे. रोख ५१ हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

इतर पुरस्कार विजेत्यांची नावे : वर्षक्रमानुसार पुढीलप्रमाणे

वली दखनी राष्ट्रीय पुरस्कार (३० हजार रु.), काझी सलिन (औरंगाबाद), निदा फाजली (मुंबई), इस्मत जावेद (औरंगाबाद). सिराज औरंगाबादी

राज्य पुरस्कार (२५ हजार रु.) डॉ. श्रीमती रफीआ शबनम आबेदी (मुंबई), अन्वर खान (औरंगाबाद), आरिफ सिमाबी (पुणे). सेतू माधवराव पगडी- मराठी/मराठी उर्दू साहित्य सेवा पुरस्कार (१० हजार रु.) श्रीपाद जोशी (पुणे), श्रीमती सज्जादी मूसवी (औरंगाबाद), संजय गोडबोले (पुणे).

साहिर लुधियानवी नवलेखक पुरस्कार (१० हजार रु.) अन्वर जाहिर खान (मरणोत्तर) (मुंबई), सलिन मोहियोद्दिन (बीड), रफिक वस्ता (रत्नागिरी).

हारून रशिद पत्रकारिता पुरस्कार (४ हजार रु.) (१९९८-१९९९) हनिफ एजाज (दैनिक उर्दू टाइम्स, मुंबई). अब्दुल सत्तार आरिफ (रोजनामा नुकूश, नांदेड) अब्दुल मजिद सरवर ('सरवर टाइम्स', मालेगाव). (१९९९-२०००) रहमानी सलिम अहमद (साप्ताहिक

बज्मे अतफाल, मालेगाव), शकील रशिद (दैनिक 'हिंदुस्तान', मुंबई), वासिक नवेद, खामगाव (प्रतिनिधी, 'उर्दू टाइम्स', मुंबई). (२०००-२००१) निसार अहमद खान (दैनिक 'औरंगाबाद टाइम्स') औरंगाबाद. वसिम अन्सारी (दैनिक 'इन्कलाब', मुंबई), जलील अन्सारी (साप्ताहिक 'सुबहोशाम', भिवंडी)

**मराठीतील दलित कवितेचे वेगळेपण**

अनुभवातील सच्चेपणा आणि तरलता यामुळे मराठी साहित्यात दलित कवितेचे वेगळेपण जाणवते, असे प्रतिपादन प्रा. डॉ. गंगाधर पानतावणे यांनी जालना येथे केले.

जालना येथील उर्दू कवी राय हरिश्चंद्र साहनी ऊर्फ दु:खी यांच्या स्मरणार्थ मराठी कविता संग्रहास राज्य पातळीवर देण्यात येणारा या वर्षीचा पुरस्कार राम दोतोंडे यांना 'गल्ली बदललेला मोर्चा' या कवितासंग्रहाबद्दल देताना डॉ. पानतावणे म्हणाले की, सध्या राज्यात कवींच्या नावाने अनेक पुरस्कार देण्यात येत असले तरी कवितेचा प्रांत उपेक्षितच आहे. कवितेला वाहिलेली अनेक नियतकालिके उदयास येतात आणि लवकरच लुप्तही पावतात, असा अनुभव आहे. दोतोंडे यांची कविता आशयगर्भ आणि रूढी परंपरेस नाकारून अस्तित्वाची जाणीर करून देणारी आहे.

दोतोंडे यांच्या 'रापी जेव्हा लेखणी बनते' या पहिल्या कविता संग्रहातील कविता ही आश्वासक आहे तर 'गल्ली बदललेला मोर्चा' या दुसऱ्या संग्रहातील कविता मराठी अभिरूची बदलवणारी व परंपरागत साहित्य संस्कृती नाकारणारी आहे.

पाच हजार रुपये रोख आणि शाल-श्रीफळ देऊन या वेळी दोतोंडे यांचा प्रा. पानतावणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात. विनित साहनी, नवल साहनी व प्रा. जयराम खेडेकर यांनी स्वागत केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. केशव देशमुख यांनी केले. संजय जोशी आणि प्रकाश शेनगावकर यांनी 'स्वरगंगेच्या काठावर' हा भावकवितांचा कार्यक्रम सादर केला.

## मार्च २००१ स्पर्धा निकाल

| | | | |
|---|---|---|---|
| पुस्तकाचे नाव : | १. | आठवणींचा मोहर | राजाभाऊ गवांदे |
| | २. | रेशीमगाठी | कांचन घाणेकर |

**या स्पर्धेत एकही स्पर्धक यशस्वी होऊ शकला नाही.**

**आमचा पत्ता -** मेहता मराठी ग्रंथ जगत, द्वारा - मेहता पब्लिशिंग हाऊस,
१२१६ सदाशिव पेठ, पुणे -३०



पुस्तक परिचय

# द मिरॅकल

## आयर्विंग वॅलेस
## अनु. जयवंत चुनेकर

**श्रद्धा-अंधश्रद्धा यांच्यातील संघर्षाचे रोमांचकारक थरारानाट्य**

'दि मिरॅकल' ही कादंबरी एका उत्कंठावर्धक कथासूत्राभोवती गुंफण्यात आली आहे. मानवी श्रद्धा-अश्रद्धा या अथांग आहेत; आणि माणूस कितीही बौद्धिक, तात्त्विक उंचीवर गेला तरी त्याच्या अंतर्मनातील मूलभूत श्रद्धा-अश्रद्धांचा आविष्कार कसा व कुठे होईल याबाबत काहीही अनुमान करता येत नाही.

आयर्विंग वॅलेस हा सेव्हन्थ सिक्रेट, सेकंड लेडी, प्राइझ वगैरे कादंबऱ्यांचा गाजलेला लेखक. येशू ख्रिस्ताची माता पवित्र व्हर्जिन मेरी यंदा पुन्हा ऑगस्टमध्ये अवतार घेणार या भविष्यवाणीवर कॅथॉलिक पंथाचे धर्मगुरू पोप अधिकृत म्हणून शिक्कामोर्तब करतात; आणि त्यासाठी नेमलेल्या समितीचा निर्णय पत्रकार परिषदेत जाहीर करतात. त्यानंतर जगभर उमटणाऱ्या या चमत्काराबद्दलच्या प्रतिक्रियांची सांगड घालून आयर्विंग वॅलेस या कादंबरीच्या कथानकामध्ये रंग भरत जातो.

फ्रान्सच्या लूर्द या लहानशा गावातील एका किसानकन्या बेनादेत्त सिबिल ही गावाबाहेरच्या एका गुहेत सहज जाते आणि तिला पवित्र व्हर्जिन मेरीचे दर्शन होते. पुढेही रोज ती गुहेला भेट देते आणि पवित्र मेरी तिला तीन रहस्यपूर्ण गोष्टी सांगते; मात्र आपल्या हयातीत ती रहस्ये गुप्तच ठेवण्याची अट घालते. खुद्द पोपने विचारले तरी ती रहस्ये आपण उघड करणार नाही असे ती म्हणते. त्या रहस्यांचा संबंध माझ्याशीच आहे, इतर कोणाशी नाही, तेव्हा ती इतर कोणाला सांगण्याची गरजच नाही असे ती ठामपणे पुन:पुन्हा सांगते. पवित्र व्हर्जिन मेरीचे दर्शन

तिला खरोखर झाले काय याबद्दल कोणी शंका घेत नाही. का? तर त्या साध्याभोळ्या किसानकन्येच्या संपूर्ण देहाला एक दिव्य रूप प्राप्त होते. चेहरा स्वर्गीय तेजाने झळाळू लागतो. डोळ्यांमध्ये अलौकिक चमक दिसते. ओठांवरचे हास्यही गूढ रम्य जाणवते. गुहेच्या प्रत्येक भेटीनंतर ती जे काही सांगते त्यातून लोकांना तिच्या साक्षात्काराची जास्तीत जास्त खात्री पटू लागते.

११ फेब्रुवारी १८५८ रोजी व त्यानंतर एकूण १८ वेळा पवित्र मेरीने बेनादेत्तला गुंफेत दर्शन दिले. हा साक्षात्कार पूर्णपणे सत्य आह, आणि त्या श्रद्धावान मुलीचा विश्वास आहे, म्हणून तिला अवर लेडी ऑफ ग्रोटो ऑफ लूर्द म्हणून मान्यता देण्याचा निर्णय नोव्हेंबर १८६२ मध्ये तेथील बिशपने नेमलेल्या पहिल्या चौकशी आयोगाच्या अहवालानंतर लूर्दमध्ये जाहीर करण्यात येतो. त्या गुहेतल्या झऱ्याच्या पाण्याने अनेकांचे असाध्य आजार बरे होतात; अनेक अपंग बरे होतात. मृत्यूआधी एका टिपणवहीत बेर्नादत्तने आपल्याला पवित्र मेरीने दिलेल्या दर्शनांची व सांगितलेल्या रहस्यांची नोंद करून ठेवली होती; आणि ती वही आपल्या एका आप्ताकडे देऊन ठेवली होती. त्या टिपणवहीचा १४० वर्षांनी अभ्यास करून तिसरे रहस्य एका पत्रकार परिषदेत उघड करण्यात येते. ते रहस्य म्हणजे १४ ते २२ ऑगस्ट दरम्यान आपण पुन्हा लूर्द येथे अवतीर्ण होऊन आणखी एका व्यक्तीला स्वत:ची ओळख पटवून देऊ आणि दु:खमुक्तीचा चमत्कार घडवून आणू.'' या नोंदीतले वर्ष हे यंदाचे वर्ष आहे.

जगातील सर्व वृत्तपत्रे 'पवित्र व्हर्जिन मेरी पुन्हा लूर्दला अवतरणार आणि रुग्णांना दु:खमुक्त करणार' अशा बातम्या पहिल्या पानावर छापतात.

या पत्रकार परिषदेला एपीआय या वृत्तसंस्थेची पॅरिसस्थित प्रतिनिधी म्हणून लिझ फिंच हजर असते. पॅरिसच्या आर्च बिशपने बोलावलेल्या या पत्रकार परिषदेला अभूतपूर्व गर्दी उसळलेली असते. बेर्नादतने मेरीच्या पुनरावतरणाची जी तारीख लिहून ठेवली आहे ती चालू वर्षातील १४ ते २२ ऑगस्ट दरम्यानची आहे. या अवधीला पुनरावतरण अवधी म्हणून घोषित करण्यात येते.

या बातमीचे महत्त्व लिझला काहीच जाणवत नाही; पण तिचा वरिष्ठ ट्रास्क म्हणतो, ''या बातमीने अर्धे जग लूर्दकडे यायला निघेल. लूर्दच्या या गुहेत आजही सालिना पन्नास लाखावर लोक भेट देतात. आपले आजार बरे झाले असे सांगणारे पाच हजारावर तरी लोक हयात आहेत. जगातल्या ७४ कोटी कॅथॉलिक ख्रिश्चनांचा त्यावर विश्वास आहे.'' आणि तो लिझला सांगतो, ''पुढचे तीन चार आठवडे तू लूर्दला राहून या घटनेचा पाठपुरावा कर. व्हर्जिन मेरीच्या पुनरागमनाबाबत प्रत्यक्ष साक्षीदारांची कहाणी मिळव.''

या असल्या भंपक भाकडकथेवर कोणीतरी विश्वास ठेवील काय असा प्रश्न लिझ फिंचला पडतो.

परंतु या बातमीने भलेभले प्रभावित होतात.

तेहतीस वर्षांचा धनाढ्य केन क्लेटन वैद्यकीय मानसशास्त्रज्ञ ॲमंडा स्पेन्सरशी लग्न करण्याच्या विचारात असतो; पण तेवढ्यात त्याला हाडाचा कर्करोग असल्याचे निष्पन्न होते; आठवड्याच्या आत शस्त्रक्रिया केली तरच जगण्याची थोडीफार आशा असे डॉक्टर व्हिटनी सांगतात. परंतु व्हर्जिन मेरीची बातमी वाचताच केन शस्त्रक्रियेला नकार देतो; आणि लूर्दला प्रयाण करतो. त्याची प्रेयसी ॲमंडा ही फादर आर्न यांना भेटून बेर्नादत्तच्या संदर्भातील बातमीबद्दल चर्चा करते. तत्संबंधित पुस्तके वाचून ती त्यांच्याशी वाद घालते.

रशियन परराष्ट्रमंत्री सर्जी तिखनॉव हे संयुक्त राष्ट्रसंघात भाषण देत असताना तेथील राजदूत इझकॉन मध्येच उठून बाहेर पडतो. नंतर तिखनॉवला तो सांगतो, ''पंतप्रधान स्क्रायबिन यांना अर्धांचा झटका आला आहे. तुमची निवड पुढचा पंतप्रधान म्हणून केली आहे. केजीबीचे प्रमुख जन. कोसॉफ यांच्याशी बोलून पुढचे प्लॅन ठरवा.'' त्याच वेळी डॉ. इव्हान्स कार्प या मूळ रशियन पण न्यूयॉर्कस्थित डॉक्टरकडे रुटिन चेकअपसाठी गेलेल्या तिखनॉवचा रिपोर्ट पाहून, त्याला डॉ. कार्प तातडीने भेटीला बोलावतो आणि तुम्हाला मस्क्युलर डिस्ट्रफी झाली आहे, ती मिश्र प्रकारची आहे. हातापायाचे स्नायू कमकुवत होत जातील. ही दुर्बलता थोपवण्यासाठी कोणताही उपाय आज ज्ञात नाही. तुम्ही राजीनामा देऊन पूर्ण व्यायाम-विश्रांतीकडे लक्ष दिले तर दहा-बारा वर्षे जगू शकाल. नाहीतर दोनतीन वर्षांपेक्षा अधिक जगू शकणार नाही.''

पंतप्रधानपदाची आलेली संधी या मस्क्युलर डिस्ट्रफीने हुकणार या विचाराने तिखनॉव बेचैन होतो. त्याचवेळी लूर्दला व्हर्जिन मेरी पुन्हा अवतरणार, रोगमुक्त करणार ही बातमी तो बघतो आणि लूर्दच्या प्रवासाची योजना आखतो. पण बनावट नावाने. बनावट पासपोर्टवर. सॅम्युअल टॅली नामक अमेरिकन नागरिक म्हणून तो वेषांतर करून फ्रान्समध्ये दाखल होतो. तेथे डॉ. मोत्ता यांना डॉ. कार्पच्या तपासणीचा रिपोर्ट दाखवितो. अकाली वृद्धत्वाकडे झुकू लागलेल्या व्यक्तींवर उपचार करणे ही त्याची स्पेशॅलिटी. डिस्ट्रफीवर उपचार हे अनुषंगिक काम.

नताली रिनाल्डी ही एक नव्या दमाची अभिनेत्री. तीन वर्षांपूर्वी ऑप्टिक ॲट्रिफने (अपुऱ्या पोषणामुळे झालेल्या दृष्टिक्षयाने) तिला अंधत्व आले, आणि तिचे अभिनय क्षेत्रातले अस्तित्वच संपुष्टात आले. तीही लूर्दला जाण्याचे ठरविते.

एडिथ मूर एका चित्रपट एजन्सीचं काम करीत असे. मालकाची वैयक्तिक सचीव. भरपूर पगार. लग्नानंतर तीन वर्षांनी तिच्या नितंबात वेदना सुरू होतात. बायोप्सी होते. सरकोमा-लहान आतड्यातील खालच्या हाडातील जोडपेशीवर गाठ. या व्याधीवरही अजून औषध सापडलेले नाही. नोकरी सोडणे तिला भाग पडते. लूर्दला जाऊन तरी बघू या असा विचार ती करते; आणि तिला तेथील पाण्याने फायदा होतो. व्याधीची तीव्रता कमी होते. कुबड्या न घेता चालता येते. पुन्हा नोकरी स्वीकारते. आर्चबिशप तिच्या व्याधिमुक्तीच्या अद्भूत कहाणीबद्दल तिच्याशी चर्चा करतात... आणि आता व्हर्जिन मेरी दर्शन देणार ही बातमी येते. आर्चबिशप तिला सांगतात, ''कदाचित मेरी तुला दिसेल. तू एक अलौकिक स्त्री ठरशील.''

तिचा नवरा रेगी हा या घटनेवर चित्रपट काढण्याची कल्पना मनात खेळवतो. 'दैवी वरदान असलेली स्त्री' पत्नी म्हणून आपल्याला लाभली आहे हे लक्षात येताच त्याच्या कल्पनाशक्तीचे विमान हवेत उंच झेपावू लागते. केवळ चित्रपट काढून थांबायचे नाही. लूर्दमधले हॉटेल विकत

घ्यायचे, लूर्दच्या सहली आखणारी ट्रॅव्हल एजन्सी चालवायची असे त्याचे मनोरथ दौडू लागतात.

स्पेनमधील जुलमी फ्रँकोच्या कारकीर्दीत छळ झालेल्या कुटुंबातला मायकेल हुर्टाडो क्रांतिकारक व लेखक बनलेला होता. कॉम्रेड क्रांतिकारक म्हणून तो बॉम्बनं लूर्दची ती नतद्रष्ट गुहाच उद्ध्वस्त करण्याची योजना आखतो. बास्क नागरिकांना गुलामीतून मुक्त करू पाहणाऱ्या इटीए या दहशतवादी संघटनेचा तो कार्यकर्ता असतो. १९७३ मध्ये ॲडमिरल ब्रँको प्रार्थनेसाठी चालला असताना स्फोट घडवून त्याची गाडी पाच मजली इमारतीच्याही वर फेकली गेली होती. हुर्टाडोची साथीदार ज्युलिया वाल्देझ ही लूर्दची गुहा बॉंबस्फोटाने उडवण्याच्या योजनेला विरोध करते. ''मायकेल, तसं करणं म्हणजे साक्षात ईश्वरी वस्तूचाच अपहार करण्याचं भयंकर कृत्य ठरेल ते!''

अशा विविध उपकथानकांची जोड देऊन आयर्विंग वॅलेस या सर्व पात्रांना लूर्द येथे आणून त्यांच्या नाट्यपूर्ण भेटीगाठीमध्ये रंग भरू लागतो.

व्हर्जिन मेरीच्या संभाव्य अवतरणाच्या आदल्या दिवशीच एपीआयची प्रतिनिधी लिझ फिंच लूर्दला येऊन ओतेला गालिआ अँड लोन्द्रमध्ये मुक्काम ठोकते. गावात फेरफटका मारते.

व्हर्जिन मेरी, बेर्नादत्त यांच्या प्रतिमांचा वापर करून तयार केलेल्या भेटवस्तूंची दुकाने भरलेली असतात. गुहेतल्या पाण्याचा वापर केलेल्या साखरेच्या कांड्या, पाण्यासाठी बाटल्या– तेथील एक वृत्तप्रसारण कचेरीत जाऊन ती धडकते. ओळखपत्र व माहितीपत्रकांचे पाकीट घेते.

झिसल द्युप्री या मार्गदर्शक तरुणीला बरोबर घेऊन ती गुंफेकडे जाते. १८५८ साली बेर्नादत्तला त्या गुहेत जे दिसले, त्याची माहिती घेते. त्याचवेळी ती झिसलला एक ऑफर देते.'' ही सारी लूर्द कथा बनावट आहे अशी माझी खात्री आहे. पण ते सिद्ध करणं आवश्यक आहे. तू हे गाव, इथले लोक यांच्या पातळीवर रहा. काही धागादोरा मिळाला तर मला सांग. मला त्यातून मोठी स्टोरी मिळेल. मी तुला खूप पैसे देईन.''

बेर्नादत्तचं बिंग फोडणारी ही कहाणी नक्कीच मोठी ठरेल अशी तिची खात्री असते.

१४ ऑगस्ट ते २२ ऑगस्ट या कालावधीत ३० लाख खाजगी मोटारी, ३० हजार बसगाड्या, ४ हजार विमानं, ४ हजार विमानं, ११०० रेल्वेगाड्या लूर्दमध्ये प्रवाशांना आणून सोडणार होत्या. दरवर्षी ५० लाख पर्यटक येत. यंदा ही संख्या कितीतरी पटीने वाढणार होती.

ॲमंडा व केन फ्लेटन फादर वुडकोर्टसह तेथे येतात. सर्जी तिखनॉव सॅम्युएल टॅली बनून येतो, आणि इतर कुठा जागा न मिळाल्यामुळे योगायोगाने झिसल द्युप्रीच्याच घरी उतरतो.

आंधळी अभिनेत्री नताली गुंफेत रोझाबरोबर जाते. बेर्नादत्तने जेथे गुडघे टेकून प्रार्थना केली त्या जागी बसून प्रार्थना करते.

हुर्टाडो गुहेत फिरत असताना त्याला केन समजून ॲमंडा स्पेन्सर क्लेटन त्याच्या दंडाला पकडते. तो तिला म्हणतो, ''तुमची काहीतरी चूक झालेली दिसते. मी क्लेटन नाही.'' मग त्या दोघांची श्रद्धेबद्दल चर्चा होते.

रात्री दोन वाजता अंध नताली एकटीच हॉटेलबाहेर पडते आणि ठामपणे पावले टाकीत ती गुंफेत जाऊन व्हर्जिन मेरीची प्रार्थना करण्यात दंग होते. तिची निश्चल समाधी लागते. थोडी हालचाल करून ती जमिनीवर उन्मनी अवस्थेत अचेतन होऊन पडते. हुर्टाडो तिला पाहून



दचकतो. तिच्या मदतीला जाण्याचे तो टाळतो. स्फोटानंतर संशयिताचा शोध सुरू झाला तर ती त्याला आवाजावरून ओळखू शकेल अशी भीती तिला वाटते. तेवढ्यात त्या हॉटेलमधला नाइट वॉचमन अनातोल तेथे येऊन तिच्या चेहऱ्यावर पाणी मारून तिला शुद्धीवर आणतो. तिला उभे करून तिचा हात पकडून तिला गुंफेबाहेर नेतो. ती दुक्कल बाहेर पडेपर्यंत वाट बघायचे हुर्टाडो ठरवतो...

हॉटेलात आल्यावर अनातोल नतालीच्या खोलीत शिरतो. तिच्याशी लगट करू शकतो. तिची किंचाळी ऐकून हुर्टाडो त्या खोलीत शिरतो आणि अनातोलाच्या जबड्यावर दणका देतो. अनातोलला तो खोलीबाहेर आणून आणखी लाथांनी तुडवतो. नताली त्याला धन्यवाद देते.

इकडे झिसलला त्या दिवशीच्या वृत्तपत्रात रशियन पंतप्रधान आजारी, पंतप्रधानपदी कोण येणार ही बातमी वाचायला मिळते. संभाव्य उमेदवारांचे फोटो बघितल्यावर त्यातील एक चेहरा ओळखीचा दिसतो. मात्र त्याखाली नाव असते तिखनॉव. तिला संयुक्त राष्ट्रसंघातले दिवस आठवतात. तिखनॉवही वृत्तपत्र पाहतो. त्याला आपला फोटो दिसतो. तो लगेच स्नानकुंडाकडे निघतो. स्नानानंतर बाहेर पडताना वेषांतर करण्यासाठी लावलेली मिशी खाली पडते. तो ती उचलून पुन्हा लावतो. तिकडे झिसल कॅमेरा लावून उभी असते. कॅमेऱ्यात आपले चित्र आले धंदेवाईक मिस्टर मूर मादाम मूर्ख मिरॅकल रेस्टॉरंट असा बोर्ड लावून कर्करोगातून मुक्त झालेल्या एडिथ मूरच्या नावाने ग्राहकांना आकृष्ट करू पाहतात. तिला भेटायला व तिच्याशी गप्पा मारायला एक वेगळे दालन सजवलेले असते. त्यासाठी खास मेनू. जबरदस्त कव्हर चार्ज. तरीही गर्दी होतेच.

लूर्दची आर्थिक सुबत्ता तेथील गुहेच्या पर्यटकांवर अवलंबून असते. त्यामुळे तेथे घडणाऱ्या चमत्कारांच्या कहाण्या लोकांपुढे सातत्याने येण्याची गरज असते.

पत्रकार लिझ किसानकन्येचा ढोंगीपणा उघड करायला आलेली असते. तिला तसे काही पुरावेही मिळतात. बेर्नादत्तच्या पहिल्या डायरीतच तसे काही उल्लेख येतात. पण अंध अभिनेत्री नताली हिला गुहेत प्रार्थना केल्यावर खरोखरच दृष्टी येते आणि तिचा व्हर्जिन मेरीचे दर्शन होते तेव्हा तिच्या मनात खरा गोंधळ सुरू होतो.

फक्त सहा व्यक्तींनाच ही घटना सांगण्याची व त्यांनी तिची वाच्यता न करण्याची शपथ घातलेली असते.

एडिथ मूरचा कर्करोग पुन्हा उचल खातो. पण त्यातून ती मुक्त होते. चमत्काराचे मग नवेच अर्थ गवसतात.

हे सगळे नंतरचे कथानकातले गुंते हे मूळातूनच वाचायला हवेत. आयर्विंग वॅलेसने त्यातील गुंतागुंत रंगवताना खूपच कल्पकता दाखवली आहे. अनेक पथ्ये पाळली आहेत. लिझलाही पत्रकारितेत स्थैर्य मिळेल अशी घेतली दक्षता आहे.

एकदा वाचायला घेतल्यावर सारखी पुढे काय अशी उत्सुकता लागून राहते आयर्विंग वॅलेसचे कथावस्तूचा उभारणीचे कौशल्य थक्क करते.

**पृष्ठे ४७७ किंमत :३००रु. सभासदांना : २२५रु. पोस्टेज :२०रु.**

# बिग इगोज, स्मॉल मेन

## राम जेठमलानी

## अनु. माधव मोर्डेकर

### कायदेपंडित राम जेठमलानी यांचा आक्रमक युक्तिवाद

राम जेठमलानी हे एक प्रसिद्धीच्या झोतात राहण्यात पटाईत असलेले वादग्रस्त कायदेपंडित म्हणून ओळखले जातात. राजकीय क्षेत्रातही त्यांना रस आहे आणि केंद्रात मंत्रीपद भूषविण्याची संधीही त्यांना लाभली. अटलबिहारी वाजपेयी यांनी त्यांना कायदामंत्री केले. परंतु खुद्द सुप्रीम कोर्टाच्या न्यायमूर्तींवरच जाहीर टीका करून जेठमलानी यांनी औचित्यभंग केला. तेव्हा पंतप्रधान वाजपेयी यांनी त्यांना राजीनामा देण्यास सुचविले. तसा निरोप परराष्ट्रमंत्री जसवंत सिंह यांच्याद्वारे पोचवला. जसवंतसिंह यांनी पुण्याच्या वाटेवर असलेल्या राम जेठमलानींना मोबाईलवर म्हटले, ''हॅलो राम, मला या क्षणी अतिशय दु:खद कर्तव्य पार पाडावे लागत आहे. तू राजीनामा द्यावास अशी पंतप्रधानांची इच्छा आहे. अर्थात, त्यामुळे आपल्या मैत्रीत दुरावा येत नाही.'' राम जेठमलानी यांनी त्यांना म्हटले, ''जसवंत, पंतप्रधानांना सांग, सूर्यास्तापूर्वी माझा राजीनामा त्यांच्या हाती पडेल. आता मी पुण्याच्या वाटेवर आहे. विमानतळावर चाललो आहे.''

२२ जुलै २००० रोजीची ही घटना.

या राजीनाम्याला निमित्त काय घडले?

२१ जुलै रोजी भारताच्या सरन्यायाधीशांनी कायदामंत्र्यांवर पर्यायाने सरकारवर टीका केली, तेव्हा कायदामंत्री जेठमलानी यांना आपल्या घणाघाती शैलीत उत्तर दिले,

न्या. बी. एम. लाल यांना मक्तेदारी प्रतिबंधक व्यापारी व्यवहार आयोगाचे अध्यक्षपद देण्याचा प्रस्ताव कायदामंत्री राम जेठमलानी यांनी मंत्रीमंडळात संमत करून घेतला. त्या



पदासाठी औपचारिक शपथ भारताच्या मुख्य न्यायाधीशांपुढे घेण्याच्या कार्यक्रमाची तारीख निश्चित करण्याची विनंती केली गेली. परंतु ती तारीख देण्याऐवजी मुख्य न्यायाधीशांनी पंतप्रधानांना गोपनीय पत्र पाठवून त्यात आक्षेपाचे तीन मुद्दे मांडले.

(१) मक्तेदारी आयोगाच्या अध्यक्षाची नेमणूक करताना, केंद्रीय मंत्रिमंडळाकडे ते नाव मंजुरीसाठी पाठवण्याआधी मुख्य न्यायाधीशांचा सल्ला घेण्यात येतो. हा आजवरचा संकेत आहे. तसा माझा सल्ला कायदामंत्र्यांनी घेतलेला नाही.

(२) अहमदी : भारद्वाज-हकीम संदर्भातील दाखला त्यासाठी उपयुक्त व मार्गदर्शक आहे.

(३) १९८७ व १९९७ मधील सर्वोच्च न्यायालयाचे दोन निकालही या दृष्टीने पुरेसे बंधनकारक आहेत.

हे पत्र पंतप्रधानांकडे गेले तेव्हा राम जेठमलानी परदेश प्रवासावर होते. पंतप्रधानांनी त्या पत्राला उत्तर पाठवले, ''या प्रकरणी संकेताचे उल्लंघन झाल्याचे मला सांगण्यात आलेले नाही. कायदामंत्री परदेश दौरा आटोपून परत आल्यावर त्यांनी आपल्याला वस्तुस्थितीची कल्पना द्यावी अशी त्यांना विनंती करीत आहे.''

कायदामंत्री जेठमलानी यांनी परतल्यावर मुख्य न्यायाधीशांना सडेतोड उत्तर पाठवले. त्यात म्हटले, ''मक्तेदारी आयोग व लवाद मंडळ (राज्यघटना भाग क्र. १४ अ मध्ये सूचित) यात फरक आहे. १९८७ आणि १९९७ चे निकाल हे लवाद मंडळाच्या संदर्भात आहेत. मक्तेदारी आणि नियंत्रित व्यापारव्यवहार कायद्याशी त्यांचा संबंध येत नाही. मक्तेदारी मंडळाच्या अध्यक्षीय नेमणुकीबाबत मुख्य न्यायाधीशाचा सल्ला घ्यावा अशी लिखित नोंद कुठेही नाही. गेल्या २० वर्षांच्या नोंदी तपासल्यावरही असा संकेत असल्याचे कोठे दिसलेले नाही. न्या. लाल हे या अध्यक्षपदासाठी पूर्णत: पात्र ठरत असल्याने हे प्रकरण संपुष्टात आले आहे असे गृहीत धरावे व शपथविधी लवकरात लवकर उरकून घ्यावा.'' (२९ जून २०००)

मुख्य न्यायाधीश डॉ. आनंद यांनी ११ जुलैला उत्तर पाठवून पत्रातील काही चुकांचा उल्लेख करून 'एक महान रहस्य' अशी त्यांची संभावना केली. तेव्हा कायदामंत्री स्वत: डॉ. आनंद यांना भेटायला गेले. मूळ पत्र आधीच हातात पडलेले असताना; त्या पत्राच्या मसुद्यातील एक जादा ओळ व तिच्यावर पंतप्रधानांनी मारलेला काट याबद्दलचा खुलासा जेठमलानींनी केला. तो डॉ. आनंद यांना पटला असावा असे जेठमलाजींना वाटते. परंतु तरीही डॉ. आनंद यांनी पूर्वाधार, प्रथा, संकेत यावर भर दिल्याने ते आपल्या आत्मसंयमनाची कसोटी पाहताहेत अशी जेठमलानींची भावना झाली. ते स्वत: चाणाक्ष कायदेपंडित. त्यांनी असा सल्ला घेताना इष्ट (अॅडव्हायजेबल) व आवश्यक (ऑब्लिगेटरी) या शब्दातील फरक मुख्य न्यायाधीशांना कळायला हवा होता अशी शेरेबाजी केली. १७ जुलै रोजी मुख्य न्यायाधीशांनी आपल्या मुद्याच्या समर्थनासाठी काही तक्ते व परिशिष्टे यासह पत्र पाठवले. त्यामुळे मुख्य न्यायाधीश एक नवी प्रथा पाडत आहेत; तशी ती पाडणे इष्ट नाही असा अभिप्राय जेठमलानींनी दिला. त्याबरोबर न्या. लाल यांच्या नावाला आक्षेप असेल तर आधीच मला सांगितल्याने प्रश्न मिटला असता, ते शिष्टाचारास धरून झाले असते. त्यावेळी असा युक्तिवादाचा पट मांडलेला नव्हता'' असे झणझणीत मतप्रदर्शन केल्याने न्यायमूर्ती आनंद यांचा पारा चढला. घटनाबाह्य अशा गोष्टीचा ते पाठपुरावा करीत होते, असे जेठमलानींचे स्पष्ट मत होते. 'या पवित्र जागेत

घुसण्याचे त्यांना काहीच कारण नव्हते.' (२३)

त्याच वेळी मध्यप्रदेश भूसंपादन प्रकरण पुढे आले आणि न्या. आनंद यांचे मन:स्वास्थ्य बिघडण्यास ते कारणीभूत झाले. कालचक्र या नियतकालिकाने ते प्रकरण प्रसिद्ध करून, त्या भूसंपादनात डॉ. आनंद, त्यांची पत्नी व सासू यांचा संबंध असल्याचे उघड केले. रमेश मेनन या शोध पत्रकाराने ते प्रकरण 'ए टंगल्ड प्लॉट' या नावाने चार भागात प्रसिद्ध केले. फ्रंटलाईन, हिंदू यामध्येही ते प्रकरण आले. राम जेठमलानी या प्रकरणाच्या गाजावाजामागे हेतूपूर्वक प्रयत्नशील आहेत असे काही हितशत्रूंनी न्या. आनंद यांच्या डोक्यात भरवले. त्यांचे कान कोणीतरी फुंकले. तशातच गांधीवादी नेत्या उषा मेहता आणि पत्रकार पी. बी. सावंत यांनी कायदामंत्रालयाकडे मुख्य न्यायाधीशांवर आरोप केलेले एक निवेदन पाठवले व मुख्य न्ययाधीशांवरच खटला भरा अशी मागणी केली.

या निवेदनाच्या बातमीने न्या. आनंद आणखीच भडकले; आणि कायदामंत्री बदलायला हवे असे विशिष्ट वर्तुळात ते बोलून गेले.

एकूणच जेठमलानी व न्या. आनंद या दोघातील मतभेद वाढवणारी घटनामालिका घडत गेली आणि जेठमलानींना आपल्याविरुद्ध मुख्य न्यायाधीश, ॲटर्नी जनरल आणि माहिती नभोवाणीमंत्री या तिघांनी कट केलाय असे वाटले. पंतप्रधानांचा या तिघांनी गैरसमज करून दिला असा त्यांचा ग्रह झाला आणि जेठमलानींना कायदामंत्रिपदाचा त्याग करावा लागला.

या तिघांचा समाचार घेण्यासाठी जेठमलानींनी आपल्या लेखणीला पोलादी पात्याची धार चढवली आणि 'बिग इगोज स्मॉल मेन' या पुस्तकाचे धूमधडाक्यात प्रकाशन झाले.

कायदामंत्री अशिष्ट व बेताल आहेत असे मत मुख्य न्यायाधीशांनी पंतप्रधानांना पाठवलेल्या पत्रात व्यक्त केले, त्यामुळे या प्रकरणाचा कडवटपणा वाढत गेला. ॲटर्नी जनरल सोली सोराबजी आणि अरुण जेटली (नंतर कायदा मंत्रीपदावर जाऊन बसलेले) या दोघांनी या प्रकरणात आगीत तेल ओतले असे जेठमलानींना वाटते.

ॲटर्नी जनरल सोली सोराबजी आणि जेठमलानी यांची आणीबाणीच्या काळात झटापट झालेली होती. सोराबजींनी आपला विश्वासघात केला अशी जेठमलानींची भावना आहे.

सोली सोराबजींनी ॲड. दिप्तेन्द्र नारायण रे यांचे नाव सेंट्रल गव्हर्न्मेंट ॲडव्होकेटस पॅनेलवर घ्यावे असे पत्र पाठवले. वकीली व्यवसायात दोन वर्षेही पूर्ण न केलेल्या या व्यक्तीच्या नावाला जेठमलानी यांनी आक्षेप घेतला. जेठमलानींनी सॉलिसिटर जनरलच्या पदासाठी एस. बी. जयसिंघानी यांचे नाव सुचवले. त्याला सोराबजींनी नकारघंटा दाखविली. तरीही जेठमलानींनी जयसिघानींना दिल्लीच्या अतिरिक्त सॉलिसिटरपदी स्थानापन्न केलेच. टेलिकॉम, एम.एस. शूज केस यातही जेठमलानी सोराबजींवर ठपका ठेवतात. ॲटर्नी जनरल सोराबजींनी हिंदुजा नॅशनल पॉवर कॉर्पोरेशनबाबतही काही मत दिले. ते मत देणे हे व्यावसायिक नीतीच्या दृष्टीने अनुचित होते असे जेठमलानींना वाटते.

केंद्र सरकार, सुप्रीम कोर्ट, मंत्रीमंडळ यांचे काम कसे चालते याचे हे आतल्या गोटातून होणारे दर्शन मर्मभेदक आहे. त्यामुळे प्रत्येक कार्यकर्त्याने ते अभ्यासले पाहिजे.

**पृष्ठे १२८ किंमत : ८०रु. सवलतीत : ६४रु. (मुदत ३१मे)**
**सभासदांना :६० रु. पोस्टेज :१५रु.**



# वेध पर्यावरणाचा

## निरंजन घाटे

### पर्यावरणाचा समतोल बिघडवणे खरोखर आपल्या हातात आहे का?

विज्ञानलेखक निरंजन घाटे यांचे 'वेध पर्यावरणाचा' हे शतकमहोत्सवी पुस्तक. गेली पंचवीसावर वर्षे सातत्याने विज्ञानक्षेत्रातील घडामोडींची दखल घेणारे त्यांचे लेखन वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होत आहे. त्यांच्या अनेक सदरांचीही पुस्तके झाली आहेत. इंग्रजीत विज्ञानविषयक लेखन विपुल प्रमाणात प्रसिद्ध होते. अनेक नियतकालिकेही निघतात. त्यांचा मागोवा घेत राहून मराठी वाचकांना जे झेपेल ते देण्याचा निरंजन घाटे यांचा ध्यास वाखाणण्याजोगा आहे. इतक्या सातत्याने हे काम करणारा अन्य लेखक नाही. अवघड पारिभाषिक संज्ञांचेही मराठीकरण करण्यात त्यांचा हातखंडा आहे.

वेध पर्यावरणाचा या पुस्तकात २६ लेख आहेत. संदर्भांची जी यादी दिली आहे तिच्यात सायंफिटिक अमेरिकन, नॅचरल हिस्टरी, स्मिथसोनियन डिस्कव्हर, वर्ल्ड वाइड फंड फॉर नेचर ही नियतकालिके आहेत. तद्वतच अवर अँग्री अर्थ, ग्लोबल वार्मिंग, ग्रीन फॅक्टस, दि रेस्टलेस अर्थ, इकॉलॉजी, दि सायलेंट स्प्रिंग, ॲनिमल रिव्होल्युशन, हाऊ सून इज नाऊ, एन्व्हरॉनमेंटल केमिस्ट्री, दि पेस्टिसाइड कॉन्स्पिरसी वगैरे गाजलेल्या पुस्तकांचाही समावेश आहे. ही महागडी पुस्तके आपल्याकडे सहजासहजी उपलब्धही होत नाहीत. निरंजन घाटे हे पुण्यामुंबईच्या नामवंत ग्रंथविक्रेत्याकडे अशा पुस्तकांसाठी लकडा लावतात; त्यासाठी हजारो रुपये खर्चही करतात. त्यांच्यामागे एखादी संस्था नाही; तरीही स्वत:च्या हौसेसाठी आणि नवीन संशोधनाचा मराठी वाचकांना परिचय करून देण्यासाठी घाटे यांची सतत धडपड चाललेली असते. सुदैवाने

आता त्यांच्या लेखनाची व पुस्तकांची उत्सुकतेने वाट बघणारा वाचकवर्गही तयार झाला आहे; आणि कितीतरी संपादक तसेच प्रकाशक त्यांचा पिच्छा पुरवीत राहू लागले आहेत. त्यामुळे रोज काही ना काही लिहिल्यावाचून त्यांना पर्यायच उरलेला नाही. त्यामुळेच शंभर पुस्तके त्यांच्या नावावर आजमितीला जमा झालेली आहेत. त्यांच्या लेखनाचा झपाटा कायम टिकून राहो, असेच वाचकांना वाटत राहील.

'वेध पर्यावरणाचा' या पुस्तकातील लेख पर्यावरणविषयक मूलभूत: संकल्पनांकडे लक्ष वेधत, सद्य:कालीन जागतिक संदर्भात निर्माण झालेल्या पर्यावरणविषयक समस्यांची माहिती देणारे आहेत. विषवृष्टी (हवेतून प्रदूषकांचा फैलाव), ओझोनचा थर व त्याच्याशी संबंधित पाश्चात्य देशांचे राजकारण, हरितगृह परिणाम, आम्ल पर्जन्य, सागरी वादळे व पर्यावरण, माणसाची हाव व पर्यावरण, बंदिवासातील प्राण्यांचे पुनर्वसन, युद्धामुळे होणारी पर्यावरणाची हानी इत्यादी विषय हे आज जगभरच्या शास्त्रज्ञांचे तसेच राजकीय-सामाजिक क्षेत्रातील विचारवंतांचे चिंतेचे विषय बनले आहेत.

पर्यावरणवादाचे प्रवक्ते म्हणता येईल अशा राचेल कार्सन हिचा आणि जेम्स इ. लव्हरलॉक -लिन मार्गुलीस यांच्या विचारांचीही ओळख करून देणारे दोन लेख या पुस्तकात आले आहेत. लव्हलॉक आणि लिन मार्गुलीस यांनी गैया सिद्धांत मांडला आहे. त्याचा गाभा पुढील शब्दात निरंजन घाटे मांडतात, ''पृथ्वीच्या पृष्ठभागाजवळचा वातावरणाचा थर हा पृथ्वीवरील जीवनाचाच एक अविभाज्य, नियंत्रित आणि आवश्यक भाग आहे. गेली कोट्यवधी वर्षे सजीवांनी पृथ्वीच्या वातावरणाचे तापमान, रासायनिक घटना, ऑक्सीडीकरणाची क्षमता आणि आम्लता यांच्यावर नियंत्रण ठेवलेले आहे.''

हा गैया सिद्धान्त पारंपरिक पर्यावरणवाद्यांच्या पचनी पडणे अवघड गेले. कारण माणूस हा प्रदूषणाद्वारे वातावरण बिघडवत आहे आणि सजीव प्राणी हे वातावरण बदलण्याबाबत (प्रदूषणाव्यतिरिक्त) अकार्यक्षम व निरुपयोगी असतात असाच समज सर्वसाधारणपणे प्रचलित आहे.

सजीव प्राणी हे आपल्या सोयीनुसार वातावरण बदलून घेतात हा विचारही सहसा कोणाला मान्य होत नाही.

नासामध्ये काम करताना लव्हलॉक व लिन मार्गुलीस हे एकत्र आले. पृथ्वी ही स्वनियंत्रित, स्वयंसिद्ध प्रणाली असून त्यात सजीव व पर्यावरण हे परस्परावलंबी घटक आहेत, सजीव आपल्याला हवे तसे वातावरणाच्या घटकांमध्ये फेरफार घडवून आणत असतात या सिद्धांताचे ते प्रतिपादन करू लागले. परंतु सजीव हे स्वकल्याणार्थ निसर्गात असा जाणीवपूर्वक बदल घडवून आणू शकतात ही कल्पना बहुसंख्य शास्त्रज्ञांना रुचली नाही. गैया म्हणजे पृथ्वीमाता. धरित्री. लव्हलॉक यांनी 'सर्वजीवसमभावाच्या' (होमिओ स्टॅटिस) या आपल्या कल्पनेला गैयावाद असे नाव देणे पसंत केले.

पृथ्वी ही एक व्यक्ती मानून तिच्या शरीराचं तापमान नियंत्रण मानवी शरीराप्रमाणेच होते असे का मानू नये असा त्यांचा प्रश्न होता. बहुतेक सजीवांच्या चयापचयक्रिया ऑक्सिजनवर अवलंबून असतात; पाण्याचा मूलभूत घटक म्हणूनही ऑक्सिजन पृथ्वीवर आढळतो. ऑक्सिजनचे प्रमाण वातावरणात २१ टक्के आहे. गेल्या चार अब्ज वर्षात या प्रमाणात फरक पडलेला नाही.



अल्ट्राव्हायोलेट अतिनील किरणांनी सूर्यप्रकाशात पाण्याचे विघटन होते आणि सुटा झालेला हायड्रोजन वातावरणात वरच्या दिशेने जातो तर ऑक्सिजन पृथ्वीलगतच्या वातावरणाच्या खालच्या थरात साठून राहतो. पृथ्वीवरच्या ऑक्सिजनचे प्रमाण कायम टिकवून धरण्यात प्रकाशाचे संश्लेषण करणाऱ्या वनस्पतींचा मोठा वाटा आहे.

सजीवांकडून निर्माण होणाऱ्या 'मिथेन' या वायूची ऑक्सिजनशी प्रक्रिया होऊन कार्बन डाय ऑक्साइड वायू तयार होतो. त्यामुळे गैया (पृथ्वीमाता) समस्थिती टिकवून धरते. जर ऑक्सिजनचे प्रमाण २१ टक्क्यांवरून ३० टक्के इतके वाढले तर पृथ्वीवर मोठे वणवे लागले असते, आणि मानव वाढत्या तापमानात टिकूच शकला नसता...

पृथ्वीवर पर्यावरणाचा समतोल कसा राखला जातो याबद्दल लव्हलॉक-मार्गुलिस यांनी अनेक कल्पना मांडलेल्या आहेत; आणि त्यांची शास्त्रीय कारणमीमांसा केली आहे. परिस्थितीकी चळवळीच्या कार्यकर्त्यांनी 'निसर्गाशी तादात्म्य' या संकल्पनेचा पाठपुरावा करणाऱ्या गेया सिद्धान्ताला पाठिंबा दिला. आश्चर्य म्हणजे प्रदूषणकारी उद्योगधंद्यांनीही या सिद्धाताचे स्वागत केले. लव्हलॉकच्या मते 'प्रदूषण हा फारसा चिंता करण्यासारखा विषय नाही. मानवाची प्रदूषणक्षमता पृथ्वीचा विचार करता फार किरकोळ आहे. अनेक सजीव जातींचा प्रदूषण हाच जीवनक्रम असतो. त्यामानाने गैया प्रणाली ही सामर्थ्यशाली आहे आणि तिने प्रदूषणकारी अनेक घटना पचवल्या आहेत.

''प्रदूषणामुळे पृथ्वीवरील सर्व जीवनाचा नाश होईल हा पर्यावरणवाद्यांचा दावा अतिरंजित व अडाणीपणाचा आहे.'' अर्थात अनेक शास्त्रज्ञांनी लव्हलॉकच्या या प्रतिपादनांवर टीकेची झोड उठवली.

आणखी एक बाब या वादामुळे लोकांपुढे आली. माणूस हा फक्त आपल्या दृष्टिकोनातून सर्व सृष्टीकडे बघतो. खरे पाहिले तर तो या सृष्टीचा एक छोटासा घटक आहे. माणसाप्रमाणेच इतर अनेक प्रजाती या पृथ्वीवर आहेत. त्यांचा विचार न करता केवळ आपल्याच सुखसोयींचा विचार केल्यामुळे माणूस हा संकटाच्या खाईत लोटला गेला आहे.

लव्हलॉकने नंतर आणखी स्पष्टीकरण दिले. ''सजीव जाती विचारपूर्वक आपल्या पर्यावरणाचं नियंत्रण करतात असं नाही. पण ही एक वैश्विक जाणीव आहे. ही एक स्वयंचलित प्रक्रिया आहे.'' पर्यावरणवादाला एक नवी दिशा देणारा 'गैयावाद' सिद्धान्त आहे.

'दि सायलेंट स्प्रिंग' या पुस्तकाची लेखिका म्हणून राचेल कार्सनने 'पर्यावरण चळवळीचा पाया' घातला. डीडीटीसारख्या कीटकनाशकांनी एकूणच वन्य जीवनाचा विध्वंस होत आहे, असे पुराव्यानिशी दाखवून देणारी लेखमाला राचेलने १९६२ मध्ये लिहिली. त्यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांनी तिची टिंगलटवाळी केली; तिला कोर्टात आव्हान दिले. तिच्याविरुद्ध प्रचाराची आघाडी उघडली. परंतु तिच्या पुस्तकामुळे सर्वसामान्य अमेरिकन जनता खडबडून जागी झाली आणि सरकारला जनमताची दखल घ्यावी लागली. ती १९६४ मध्ये कर्करोगाने वारली; परंतु तिने रासायनिक द्रव्यांच्या वापरामुळे एकूणच निसर्गाचा व पर्यावरणाचा कसा संहार होत आहे याचे केलेले विवेचन हे सुजाण मानवतावादी व्यक्तींच्या जिव्हारी लागले. दि सायलेंट स्प्रिंगच्या रूपाने निसर्गाच्या व्यथावेदनांचे व्यापक भान मानवमात्राला झाले. डीडीटीच्या वापरावर बंधने

घालण्यात आली. रसायनांच्या दुष्परिणामावर अभ्यास संशोधनाचे प्रकल्प विद्यापीठातून हाती घेण्यात आले.

या पुस्तकामुळे पर्यावरण संरक्षणाची निकड तर लोकांना पटलीच; मानवेतर जीवसृष्टीवर जो परिणाम होतो, त्याचाही विचार करायला हवा ही जाणीव प्रथमच प्रखरपणे माणसाला झाली. इकॉलॉजी (पारिस्थितिकी) चळवळीला त्यातून प्रेरणा मिळाली. युरोप-अमेरिकत अनेक दबाव गट निर्माण झाले.

१९७२ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या पुढाकाराने स्टॉकहोम येथे जागतिक परिषद घेण्यात आली. रसायनांचा अमर्याद वापर केला तर उद्या निसर्गात वसंत ऋतूचा बहर दिसणारच नाही; वसंत मूक होईल; हा धोक्याचा इशारा या परिषदेतील चर्चासत्रांतून पुन:पुन्हा ठसवण्यात आला. मानवानं आखलेल्या सीमारेषा निसर्गाला मान्य होतातच असे नाही. **निसर्गाचं स्वत:चं चक्र असतं. हवामान बदलाचा किंवा पर्यावरणाचा शस्त्र म्हणून वापर करण्याचा विचार त्यामुळे व्यर्थ ठरतो.** (१९८) पर्यावरण ही एक सतत बदलती नैसर्गिक प्रणाली आहे. हवामानावर शंभर टक्के नियंत्रण ठेवणं ही अशक्य कोटीतली गोष्ट आहे.

भूकंप, ज्वालामुखी, आम्ल पर्जन्य, वाढत्या लोकसंख्येमुळे अन्न व निवारा यासाठी होणारी निसर्गसंपत्तीची लूट, कीटकनाशकांमुळे होणारे भूजलाचे नुकसान, वाढत्या वाहनांमुळे वातावरणात वाढत चाललेले कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण, हरितगृह परिणामामुळे पृथ्वीच्या तापमानावर होणारा परिणाम, अण्वस्त्रांच्या स्फोटामुळे होणारा किरणोत्सर्ग, ऊर्जा स्रोतावर पडणारा ताण, वगैरे बाबींचाही एकूण पर्यावरणावर प्रभाव पडणे अपरिहार्यच आहे. अशा अनेक बाबींकडे लक्ष वेधणारे निरंजन घाटे यांचे हे पुस्तक पर्यावरणवादी व्यक्तींना अभ्यासावेसे वाटेल तर सर्वसामान्य वाचकांना एक नवीच दृष्टी देईल.

**पृष्ठे :२३२ किंमत :१५०रु. सवलतीत : १२०रु. (मुदत ३१मे)**
**सभासदांना :११३रु. पोस्टेज :१५रु.**


## निरंजन घाटे यांची विज्ञानविषयक लोकप्रिय पुस्तके

| | |
|---|---|
| इलेक्ट्रॉनिक्स | ४०रु. |
| पर्यावरण प्रदुषण | १३०रु. |
| वेध पर्यावरणाचा | १५०रु. |
| ज्ञानज्योति | ३०रु. |
| विज्ञान आणि आपण | ३०रु. |
| आरोग्य वेध | ४५रु. |
| शरीर वेध | ४५रु. |
| ज्ञानदीप | ७०रु. |
| खेळ आणि विज्ञान | ४०रु. |
| यंत्रलेखक | ११०रु. |
| एकविसावं शतक | १५०रु. |
| जिज्ञासापुर्ती | १५०रु. |




# १९६० नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह

## आनंद यादव

### साहित्य प्रवाह : संकल्पना व स्वरूप

एकोणिसशे साठनंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह हे डॉ. आनंद यांचे नवे पुस्तक.

डॉ. आनंद यादव हे मराठी साहित्य क्षेत्रातील ग्रामीण साहित्याची चळवळ नेटाने राबवत आहेत; आणि तिला पोषक अशी वैचारिक भूमिका मिळेल त्या व्यासपीठावरून सातत्याने ठसठसशीतपणे मांडत आहेत. शहरी साहित्य हे पाश्चात्य संस्कृतीच्या भ्रष्ट अनुकरणातून अवतरलेले असल्याने, त्यात स्वसंस्कृतीचे सांस्कृतिक भान अभावानेच दिसते, हे परभृत साहित्य बव्हंशी स्वप्नरंजनात्मक असते. त्यातील मध्यमवर्गीय बुद्धिजीवी, पांढरपेशे अनुभवविश्व हे ग्रामीण भागात राहणाऱ्या ६०-७० टक्के समाजापासून अलग पडलेले असते; ते बरेचसे बाजारी असते; आणि ग्रामीण जीवनाचे त्यात येणारे चित्रण हे विनोदाच्या नावाखाली विकृतीकडे झुकणारे असते (१०६) असे डॉ. यादव यांना वाटते.

ग्रामीण विभागातील गुदमरलेल्या सुशिक्षित तरुण मनाचा आविष्कार करणारे साहित्य निर्माण व्हायला हवे, त्यांच्या घुसमटत्या मनाच्या आविष्कारातून जन्माला येणारे साहित्य समाजाचे मन कमी-अधिक प्रमाणात संस्कारित करू शकेल आणि तरुण पिढीची उमेद वाढवू शकेल, त्यांच्या अपेक्षाभंगावर फुंकर घालू शकेल आणि त्यांच्या मनाचा विकास साधू शकेल, त्याची कोंडी फोडू शकेल (१०६) अशी डॉ. यादव यांची भावना आहे.

ग्रामीण भागाचा आज कायापालट होत आहे, आर्थिक, शैक्षणिक, औद्योगिक परिवर्तनाचे

वारे वाहत आहेत, त्यातून अनेक समस्या पुढे येत आहेत; शोषण, पिळवणूक, भ्रष्टाचार, सरंजामशाही मनोवृत्ती, विषमता, प्रस्थापितांचा माज यामुळे ग्रामीण भागातला तणाव वाढत असून त्याचा स्फोट होईल, त्यातून कलह माजेल आणि या समाजाला तडे जातील अशी भीती त्यांना वाटते. (१०७). हा तणाव टाळण्याचे सामर्थ्य साहित्यात आहे; साहित्यामुळे संभाव्य सर्वनाश टळू शकेल, ग्रामीण समाज एकसंध होईल, प्रबोधनाकडे वाटचाल करील, लोकशाहीतील समताधिष्ठित समाजरचना स्वीकारून सर्व समाजस्तरांना एकत्र आणील अशी आशा त्यांना वाटते. (१०७)

साहित्य म्हणजे केवळ कथाकादंबऱ्या-काव्य-ललित वाङ्मय नव्हे, साहित्यात समाजाला आवश्यक असे संशोधन-प्रबोधनही येत. निबंध, प्रबंध, विवरण, विचार मंथन, चर्चा, मीमांसा असणारे सार्थ शब्द हेही साहित्यच होय हे आनंद यादव आवर्जून सांगतात. (१०७). असे साहित्य अनेक अंगांनी माणसाचे मन घडवते, समाजाचे प्रश्न त्याला समजावून सांगते, त्याची भावस्पंदने जागवते; या अर्थाने डॉ. यादव हे साहित्याचे सांस्कृतिक महत्त्व अग्रगण्य मानतात. साहित्याच्या या सांस्कृतिक महत्त्वाचे विस्मरण मागच्या पिढीला झाले; (१०७) त्यामुळे ग्रामीण जीवनाचे बदलते प्रवाह साहित्यात येण्याची प्रक्रिया दुबळी पडली. हे सांस्कृतिक महत्त्व वेळीच कळले असते तर ही बदलल्या ग्रामीण जीवनाची गरज ओळखून साहित्य संस्था, नियतकालिके वगैरे व्यासपीठांचीही निर्मिती व्यापक पातळीवर झाली असती. जो उठतो तो राजकारणात पडतो– ही स्थिती काहीशी पालटली असती. पुण्या-मुंबईसारख्या शहरातील मध्यमवर्गीय बुद्धिजीवी वर्ग जी वृत्तपत्रे-मासिके चालवतो, त्यातून ग्रामीण समाजाचे विकृत चित्रणच समाजापुढे येत राहते; प्रस्थापित शहरी जीवनमानाचे श्रेष्ठत्व नकळत वाचकमनावर ठसवण्याचा हा जणू एक डावच असतो. राजकारण करणाऱ्या ग्रामीण नेतृत्वाजवळ एकही वृत्तपत्र व नियतकालिक साधन म्हणून भक्कमपणे उपलब्ध नाही आणि त्यामुळे आपली भूमिका जनतेपुढे नेटकेपणाने मांडण्यात ते मागे पडते; जाहिरातीच्या रूपाने या वृत्तपत्र-मासिकांना तो मिंधे करू पाहतो; परंतु ऐन मोक्याच्या वेळी ही शहरी वृत्तपत्रे त्याची कड घेतलीच असे खात्रीने सांगता येत नाही. ग्रामीण भागातील वाचनालये बहुजन समाजाच्या ताब्यात असली तरी तेथील ग्रंथपाल करमणूकप्रधान, वासना विकार चाळवणारी सवंग पुस्तके व मासिकेच जास्त मागवतात, तरुण पिढीच्या हाती ओंगळवाणे, विकृत चटोर साहित्य देऊन कुसंस्कार करतात असा आरोप डॉ. यादव करतात. (१०८).

साहित्य हा व्यापक अर्थाने जागृत समाजजीवनाचा आरसा असतो. प्राचीन संस्कृत साहित्यात राजा वा राजपुत्र हेच नायक म्हणून प्रामुख्याने दिसतात.

मध्ययुगात स्वत: परमेश्वर हाच संपूर्ण संतसाहित्याचा नायक होता.

ब्रिटिश अमदानीत मध्यमवर्गीय ब्राह्मण समाजाचे प्रतिनिधित्व करणारे साहित्य निर्माण झाले.

स्वातंत्र्योत्तर काळात वेगवेगळ्या जनजाती जागृत होत गेल्या, त्यांचे नायक साहित्यात रंगवले जाऊ लागले.

१९६०-६५ च्या दरम्यान शिक्षण प्रसार, लोकशाही, शिक्षण सवलती, व्यक्तिस्वातंत्र्य,



मतदानाचा हक्क, सहकारी क्षेत्राचा वाढत व्याप, राखीव जागा यामुळे जुनी मुल्ये, जुने मानदंड, जुने स्तरीकरण, जुने अर्थकारण हळूहळू क्षीण होऊन नव्या गतिमान, इहवादी स्पर्धात्मक पर्वाचा आरंभ झाला. डॉ. यादव म्हणतात की, 'आजवरच्या उपेक्षित लोकसागराला नव्या जाणिवांची उत्तुंग भरती येत होती. या उत्तुंग भरतीचा म्हणजे अस्वस्थ जाणिवांचा आविष्कार स्वातंत्र्योत्तर साहित्यप्रवाहात दिसतो. दलित, ग्रामीण, जनवादी, स्त्रीवादी, कामगार, आदिवासी साहित्य, मुस्लिम, हिंदू, जैन यांचे साहित्य हे कोंडी, कुचंबणा, अन्याय, शोषण, दैन्य, दु:ख, उपेक्षा यांच्या कैचीत कुचंबणाऱ्या लोकसमूहाचे साहित्य होते... या सर्व साहित्यप्रवाहांना सर्वार्थाने समता हवी होती. शोषणरहित समाजरचना हवी होती. मानवतावादी, शुद्ध राष्ट्रीय भावनेने प्रेरित झालेली समाजरचना हवी होती. हे सर्व प्रवाह समग्र परिवर्तनाची आकांक्षा धरणारे होते; आणि त्यात्या जनजाती समूहाच्या पूर्वानुभवांच्या रागलोभाचे त्या त्या भाषिक वैशिष्ट्यांसह प्रकटीकरण करणारे होते असे ते मानतात. या दृष्टीने १९७० ते १९९५ हा पंचवीस वर्षांचा काळ त्यांना धामधुमीचा आणि उत्कर्षाचा वाटतो. पूर्वसूरींना धक्के देणारे, प्रस्थापितांना त्यांच्या अपराधित्वाची जाणीव करून देणारे, निर्मितीचा ओघ तुडुंब भरून वाहणारे असे हे साहित्यप्रवाह होते. या सर्वच प्रवाहांनी प्रतिष्ठाने, संमेलने, व्यासपीठे, संस्था, नियतकालिके यांच्या रूपाने आपले क्रियाशील अस्तित्व प्रकट करण्याचा आणि पूर्वसूरींशी संघर्ष करीत स्वत:चे स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न चालवला होता; असे मार्मिक विश्लेषण डॉ. यादव यांनी केले आहे. हे प्रवाह १९९० ते १९९५ या काळात बरीच स्थिरता पावले. प्रवाहाच्या कमी-जास्त ऊर्जेप्रमाणे त्यांना यश मिळाले. जाती-धर्म-प्रदेश-समूह यांच्या जोरावर प्रवाह निर्माण करू पाहणारे काही काळानंतर मागे पडले; अंतर्मुख होऊन आत्मशोध घेणे वा साहित्याचे स्वयंसिद्ध स्वरूप आकळून घेणे यात जे कमी पडले तेही मागे पडले. प्रत्येक टप्प्यावर नवा आशय, नवा आकृतिबंध जाणीवपूर्वक आत्मसात करणारे या आवर्तातून बाहेर पडले. आपल्या अंगभूत सामर्थ्याने स्वत:चे वेगळेपण प्रस्थापित करू शकले, असे डॉ. यादव यांना आढळून आले.

साहित्यप्रवाहाची ही संकल्पना गुंतागुंतीची आहे. साहित्यप्रवाह नेमके कशाला म्हणायचे, ते इझम, वृत्ती प्रवृत्ती, प्रकार यापासून अलग कसे ठरतात हे शोधण्याचा प्रयत्न डॉ. यादव यांनी या पुस्तकातील लेखांद्वारे केलेला आहे. 'साहित्यप्रवाहांचे स्वरूप' हा स्वतंत्र लेख या पुस्तकासाठी मुद्दाम लिहून, या संकल्पनेचा सर्वकष मागोवा घेतला गेला आहे. प्रवाहांचा योग्य तो सन्मान करण्याची, त्यांची योग्य ती मीमांसा करण्याची, सहानुभूतीने सुजाणपणे नोंद घेण्याची गरज असते असे सांगून, त्यांची उपेक्षा करणाऱ्यांना इतिहास क्षमा करीत नाही असा इशारा डॉ. यादव देतात. प्रस्थापित साहित्यविश्वातील समीक्षक मतलबी व हस्तिदंती मनोऱ्यात बसून नव्या प्रवाहांबाबत उपेक्षेची, तुच्छतेची, दांभिकतेची भूमिका घेतात. ही वृत्ती त्यांनी सोडायला हवी असे डॉ. आनंद यादव पुन:पुन्हा बजावतात.

कथाकार माटे, साहित्य संमेलनाच्या व्यासपीठाच्या मर्यादा, मराठी साहित्यातील ग्रामीण स्त्री, वाङ्मयीन नियतकालिके, साहित्यसंस्था व सामाजिक जाणिवांचे नवे साहित्य इत्यादी लेखही अशा आग्रही प्रतिपादनामुळे लक्षात राहतात. 'साहित्य चळवळी, समाज आणि साहित्यिक' ही मुलाखत कोल्हापूर साहित्य संमेलनातील असून वेगवेगळ्या व्यासपीठावरून केलेल्या

भाषणांचाही या पुस्तकात समावेश आहे.

समरसता मंचाच्या संमेलनाचे अध्यक्ष म्हणून १९९८ मध्ये केलेले भाषण डॉ. हेडगेवार, गोळवलकर गुरुजी यांची नावे फुले-आंबेडकर-गाडगे यांच्या जोडीने येतात; तेव्हा काही जणांना आश्चर्य वाटले तर नवल नाही. चळवळीतून चांगले साहित्य निर्माण होत नाही, चळवळीसाठी साहित्य म्हणजे वाङ्मयीन गुन्हेगारी असे डॉ. यादव यांनी नागपूरला एका परिसंवादात म्हटले. चळवळीच्या बांधिलकीने साहित्यिकाच्या स्वातंत्र्यावर गदा येते; ग्रामीण साहित्यिक कोणत्याही महापुरुषाचे नाव उठल्याबसल्या उच्चारत नाही; ग्रामीण साहित्य हे जीवनवादी साहित्य असल्याने विद्रोहाची त्याला गरज नाही. या निष्कर्षापर्यंत ते आता आले आहेत. त्यामुळे त्यांचे हे पुस्तक म्हणजे एका वाङ्मयीन भूमिकेची वीस वर्षांच्या प्रदीर्घ अवधीत झालेली विकासशील वाटचाल म्हणूनही लक्षणीय ठरेल.

**पृष्ठे :२०० किंमत :१५०रु. सवलतीत : १२०रु. (मुदत ३१मे)**
**सभासदांना :११३ रु. पोस्टेज :१५रु.**

प्रिय रसिक वाचक,

आपण आमची अनेक दर्जेदार पुस्तके वाचली आहेत. नवीन पुस्तकांनाही आपणाकडून भरभरून प्रतिसाद मिळत आहे.

आपणास 'खास' आवडलेल्या आमच्या पुस्तकांबद्दलचा आपला अभिप्राय आम्हास महत्त्वाचा वाटतो. तरी आपला अभिप्राय कळवा.

'मेहता मराठी ग्रंथजगत' मध्ये 'रसिकांची आवड' मधून त्याची 'खास' दखल घेतली जाईल.

आमचा पत्ता — मेहता मराठी ग्रंथजगत
द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१२१६, सदाशिव पेठ,
धनश्री अपार्टमेंट, पुणे - ४११०३०
फोन : ४४७६९२४
फॅक्स : ०२० - ४४७५४६२



# श्रद्धांजली

### शंकरराव खरातांचे निधन

माण देशातील आटपाडीत ११ जुलै १९२१ ला जन्मलेले शंकरराव रामा खरात शिक्षणाच्या ओढीने पुण्यात आले. अहिल्याश्रमात राहून त्यांनी फर्ग्युसन महाविद्यालयातून पदवी घेतली. कायद्याची पदवी घेतल्यानंतर त्यांनी पुण्यात वकिली सुरू केली. पुणे विद्यापीठाने त्यांचा डी.लिट. पदवी देऊन सन्मान केला होता. आंबेडकरांच्या सहवासात आल्यावर ते सक्रिय राजकारणाकडे वळले. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, पूर्वीच्या मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू, 'प्रबुद्ध भारत'चे संपादक, रेल्वे सर्व्हिस कमिशनचे अध्यक्ष, बँक ऑफ इंडियाचे संचालक, असे वैविध्यपूर्ण कर्तृत्व असलेल्या खरात यांनी दलित जीवनाचे चित्रण करण्यावर भर दिला होता. १९५६ पासून लेखन करणाऱ्या खरात यांनी दहा कादंबऱ्या, बारा कथासंग्रह, पाच ललितलेख संग्रह व काही वैचारिक लेखसंग्रह लिहिले. 'तराळ-अंतराळ' या त्यांच्या गाजलेल्या आत्मचरित्राला कोलकत्याच्या भारतीय भाषा परिषदेचा पुरस्कार मिळाला होता. अगदी रुग्णालयात दाखल करेपर्यंत ते लिहित होते. राज्य घटनेवरील मूलभूत स्वरूपाचे लेखन बलुतेदार-अलुतेदार यांचा गेल्या पन्नास वर्षांतील इतिहास, मार्क्स व आंबेडकर यांची दृष्टी वेगवेगळी कशी व का होती, याची मांडणी करणारे लेखन त्यांनी या काळात पूर्ण केले. संत ज्ञानेश्वर व संत चोखोबा यांच्या जीवनप्रवासाचा मागोवा घेण्याच्या निमित्ताने संतांच्या सामाजिक दृष्टीचा वेध घेणारा ग्रंथही त्यांनी अलीकडेच पूर्ण केला होता. ९ एप्रिल रोजी वैकुंठ स्मशानभूमीत पोलिसांनी बंदुकीच्या तीन फैरी झाडून त्यांना मानवंदना दिली. त्यानंतर बुद्धवंदना झाल्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

राज्य साहित्य संस्कृती मंडळातर्फे त्यांना सात एप्रिलला गौरववृत्ती देण्यात आली; पण त्यापूर्वीच दोन दिवस ते अर्धबेशुद्धावस्थेत असल्याने त्यांच्याऐवजी ही गौरववृत्ती त्याचे पुत्र डॉ. रवी यांनी स्वीकारली होती.

### 'पद्मश्री' स्वीकारण्यापूर्वीच कवी कालिदास गुप्ता यांचे निधन

२१ मार्च रोजी राष्ट्रपती के. आर. नारायणन यांच्या हस्ते देण्यात येणाऱ्या यावर्षीच्या पद्मश्री पुरस्कारांत उर्दू आणि फारसी विचारवंत आणि कवी कालिदास गुप्ता उर्फ 'रिझा' यांचेही नाव होते; परंतु पुरस्कार स्वीकारण्यापूर्वीच त्यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.

जालंधर जिल्ह्याच्या मुकुंदपूर येथे २५ ऑगस्ट १९२५ रोजी त्यांचा जन्म झाला होता.

मिर्झा गालिब यांच्यावरील अभ्यासामुळे भारतात, तसेच पाकिस्तानातही त्यांच्या नावाचा दबदबा होता. मिर्झा गालिब यांचे निवडक दोन हजार शेर त्यांनी मिळवून प्रसिद्ध केले होते. विशेष म्हणजे, हेच शेर स्वत: गालिब यांनी पसंतीस न उतरल्याने अडगळीत टाकून दिले होते. त्यातील प्रत्येक शेर गालिब यांनी कधी लिहिला आहे, याचीही क्रमवारी त्यांनी या पुस्तकात परिश्रमपूर्वक मिळवून दिली आहे.

# फुले आणि काटे

## इंदिराजींच्या चरित्राचा निष्फळ वाद

कॅथरिन फ्रँक यांनी लिहिलेल्या इंदिरा गांधी यांच्या चरित्रावर बंदी घालण्याची मागणी काँग्रेसच्या काही नेत्यांनी केली असली, तरी तशी भूमिका घेणे या पक्षालाच पुढे अडचणीचे ठरणार आहे. नेहरू-गांधी घराणे हे अनेक काँग्रेसवाल्यांचे मोठे दैवत. या घराण्याला देवत्व दिले, की त्यांच्या भक्तांची सोय होते. आपल्या व्यक्तिगत सत्तास्थानाला धक्का लागू नये या पलीकडे विचार करण्याची कुवत अजूनही अनेक काँग्रेस पुढाऱ्यांमध्ये आलेली नाही, ही दुर्दैवाची बाब आहे. या पुस्तकात नेमके काय लिहिले आहे, ते कोणत्या संदर्भात आहे, याची शहानिशा न करता निषेधात्मक होळ्या करण्याने काय साध्य होणार? पण हा सारासार विचार त्यांना सुचत नाही. लंडनमध्ये प्रकाशित झालेल्या या पुस्तकाच्या ज्या तीन हजारांवर प्रती मार्चमध्ये भारतात मागविण्यात आल्या, त्या चार दिवसात खपल्या. इतकेच नव्हे, तर आणखी दोन हजारांवर प्रतींची मागणी नोंदविली गेली, हे पुस्तकप्रेम वाढल्याचे खचितच लक्षण नाही. एखाद्या नेत्याच्या खासगी आयुष्याबद्दल खळबळजनक, चमचमीत वाचायला मिळेल, अशी अपेक्षा ठेवणारी ही आंबटशौकीन प्रवृत्ती तर यामागे नसावी?

पण हे चरित्र अशा आंबटशौकिनांसाठी नाही. ५६७ पानांचे हे पुस्तक लेखिकेने अत्यंत मेहनतीने, अभ्यासपूर्ण भूमिकेतून लिहिलेले आहे; पण त्यातील काही उल्लेख काँग्रेसजनांना उगाचच अस्वस्थ करीत आहेत. पंडित नेहरूंच्या त्यांनी आधी लिहिलेल्या चरित्रातील काही भाग वादळी होता. विशेषत: लेडी माउंटबॅटन यांच्याशी त्यांच्या असलेल्या मैत्रीपूर्ण नात्याचा संदर्भ हा वादविषय ठरला; पण त्यामुळे नेहरूंचे कर्तृत्व किंवा त्यांच्याविषयीचा आदर तसूभरही कमी होत नाही. इंदिराजींच्या या चरित्रात जे काही खळबळजनक आहे, असे काँग्रेसजनांना वाटते, त्यात नवीन असे काहीच नाही. इंदर मल्होत्रा यांनीही ते एका मुलाखतीत स्पष्ट केले आहे. नामवंत पत्रकार असलेल्या या लेखकाच्या पुस्तकात त्यातील काही भाग सूचकपणे आलेला आहे. पंडित नेहरूंचे खासगी सचिव ओ. पी. मथाई, इंदिरा गांधी यांच्या मंत्रिमंडळात अमसणारे दिनेश सिंह आणि योगशिक्षक धीरेंद्र ब्रह्मचारी यांच्याशी इंदिराजींच्या असलेल्या संबंधाबाबत यापूर्वीही बरेच लिहिले गेले आहे. शांतिनिकेतनमध्ये असताना त्या फ्रेंच शिकवणाऱ्या एका जर्मन शिक्षकाच्या प्रेमात पडल्याचा उल्लेख फ्रँक कॅथरीन यांच्या पुस्तकात आहे. तो कदाचित नवीन भाग असेल; पण त्यामुळे इंदिराजींच्या प्रतिमेला कसा काय धक्का पोचतो?

प्रसिद्धीच्या झोतात असलेल्या वलयांकित नेत्यांच्या प्रतिमा अनुयायांना देवासारख्या वाटत असल्या, तरी कोणताही नेता हा अखेर माणूस असतो, हे समजावून न घेतल्याने हे सारे प्रश्न उभे राहतात. नेत्याविषयी कार्यकर्त्यांच्या मनात असलेल्या प्रतिमेप्रमाणे तो प्रत्येक क्षण जगेल अशी अपेक्षा करणेही चुकीचे आहे. ज्या उच्चपदावर तो आरूढ आहे, त्याच्या ताणतणावाची, मानसिक वादळाची किती जणांना कल्पना असते? त्याच्याकडून असमान्य देदीप्यमान कामगिरीची अपेक्षा करताना त्याचे मोजमाप सामान्यांच्या फूटपट्टीने करणे हे त्यांच्यावर अन्याय करण्यासारखे नाही का? इंदिरा गांधी यांच्याबाबतही असेच म्हटले पाहिजे. ज्या पंडित नेहरूंनी एके काळी आपल्या कन्येच्या बुद्धीची कीव केली, ती पुढे मोठेपणी केवळ भारताच्याच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय राजकारणावर आपला प्रभाव टाकू शकली हे विलक्षण कर्तृत्व आहे. अशा असामान्य स्त्रीला व्यक्तिगत आयुष्यात काहींचा आधार घ्यावासा वाटला असेल, तर त्यात वावगे काय? शिवाय त्यामुळे त्यांची लोकविलक्षण कामगिरी अजिबात झाकोळली जात नाही. मुरली देवरा यांच्यासारखे मुंबईतील काँग्रेस नेते या चरित्रावरील बंदीच्या मागणीचे समर्थन करतात, त्या वेळी त्यामागच्या हेतूचीच खरे तर शंका यायला लागते. महापुरुषांची चरित्रे त्यांच्या खोट्या स्तुतिसुमनांनी भरलेली असावीत, अशी अपेक्षा ठेवणे हा शुद्द ढोंगीपणा झाला. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा वस्तुनिष्ठ वेध घेण्याची प्रगल्भता आपण कधी दाखविणार आहोत? या व्यक्तींच्या खासगी आयुष्यातील संबंधाबाबतही आपण अधिक डोळसपणे पाहणार की नाही, हाही प्रश्न आहेच, त्यामुळे या चरित्राच्या टीकाकारांचेच प्रबोधन करण्याची नितांत गरज या पार्श्वभूमीवर प्रकर्षाने जाणवत आहे.


–अनिल टाकळकर

(सकाळ)

**पॉण्डेचरी परवाना प्रकरण, बोफोर्स, हवाला भानगड, चारा घोटाळा आणि झारखण्ड मुक्ती मोर्चा, लाचलुचपत घटना यांचा तपशीलवार वृत्तान्त देत, भारतीय राजकारणातील गुन्हेगारी जग आणि भ्रष्टाचार यांचे विदारक वास्तव सांगणारा, मती गुंग करणारा दस्तऐवज.**

**भारतीय राजकारणातील गुन्हेगारी व भ्रष्टाचार**

**मूळ लेखक : निर्मलकुमार सिंग**
**अनु. : माधव मोर्डेकर**




**पृष्ठे : ३२८ किंमत : २००रु. सवलतीत : १७०रु.**
**सभासदांना : १५० रु. पोस्टेज : १५रु.**

## ॥रसिक वाचकांना आवाहन॥

वाचकांसाठी आम्ही एक नवे सदर सुरू करीत आहोत. वाचकमित्रहो, आमच्या प्रकाशनाच्या आपल्याला आवडलेल्या पुस्तकांबद्दलचे मत पत्ररूपाने कळवा. या पत्रांना शक्य होईल त्याप्रमाणे ग्रंथजगतच्या अंकात प्रसिद्धी दिली जाईल. वाचकांनी स्वत:चे नाव, पत्ता, शिक्षण व व्यवसाय इ. माहितीसह आपली मते कळवावीत.

**आमचा पत्ता**


**मेहता मराठी ग्रंथजगत**, १२१६ सदाशिव पेठ, पुणे-३०

---

स.न.वि.वि.

'गुंता सोडविताना' हे पुस्तक नुकतेच वाचले. डॉ. प्रा. अनुराधा गुरव या संवेदनशील लेखिका, कवयित्री आहेतच, व समाजसेविकाही आहेत.

सामाजिक कार्य करताना आपल्या तरल संवेदनशीलतेने त्यांनी अन्यायी, दु:खी मनांचा आरपार ठाव घेत, त्यांची दु:खे जाणून घेण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. कायदा माणसांसाठी असतो हेच यावरून दिसून येते. कथांमधून साकारलेल्या व्यक्तिरेखा डोळ्यांसमोर जिवंत उभ्या राहतात. या पुस्तकात अर्जदाराला समोर एक माणूस म्हणूनच बघितलं जातं; आणि त्याला न्याय मिळेल असा प्रयत्न केला जातो. असंच न्यायी लेखन करण्यात लेखिका यशस्वी झाली आहे. कधी-कधी या कथा वाचताना वाचकही सुन्न, बधिर होऊन जातो.




मंदाकिनीच्या कथेत, ''स्त्रीजातीच्या सोसण्याचे अनेक प्रकार ऐकले, पाहिले पण मंदाचे सोसणे कल्पिताहूनी भयानक होते. पायात बळ आणीत उठून घरी कशी आली हे समजलेच नाही'' हे संवेदनशील हळव्या कवयित्रीचे मन आपल्यालाही तीच अनुभूती देऊन जाते.

समाजिक गुंता सोडविताना प्रा. अनुराधा गुरव यांचे सौजन्य, प्रगल्भ, समतोल विचार, न्यायी भूमिका तरीही अलिप्तपणे दिलेल्या न्याय पद्धतीबद्दल अतीव आदर वाटतो. उध्वस्त होणाऱ्या घरांना सावरण्यासाठी झोकून देऊन केलेले प्रयत्न काळजाला भिडतात. या आशयघन, टोकदार कथांतून लेखिकेचे बहुगुणी, आभाळाएवढे व्यक्तिमत्त्वही लेखनाच्या कॅनव्हासमुळे उठून दिसते.

कळावे,

आपली रसिक वाचक
सौ. सावित्री जगदाळे
न्यू पॅलेस परिसर,
कोल्हापूर.




# मेहता मराठी ग्रंथजगत

- मे २००१
- वर्ष पहिले
- अंक सातवा


— *अनुक्रमणिका* —


| | |
|---|---|
| **संपादकीय** - | २ |
| **साहित्यवार्ता** | ५ |
| **पुरस्कार** | २४ |
| **पुस्तक परिचय** | |
| द मिरॅकल - अनु. जयवंत चुनेकर | २७ |
| बिग इगोज,स्मॉल मेन - अनु. माधव मोर्डेकर | ३२ |
| वेध पर्यावरणाचा - निरंजन घाटे | ३५ |
| नामशेष झालेले प्राणी- डॉ. किशोर पवार | ३७ |
| १९६० नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह - आनंद यादव | ३९ |
| **श्रद्धांजली** | ४३ |
| **फुले आणि काटे** | ४४ |
| **नवी स्पर्धा** | २३ |
| **निकाल** | २६ |



- संपादक : सुनील मेहता
- कार्यकारी संपादक : शंकर सारडा
- संपादन सहाय्य : सुनीता दांडेकर
- अंकाची किंमत १० रु.
- वार्षिक वर्गणी ८० रु. तीन वर्षांची २००रु. पाच वर्षांची ३००रु.
- वार्षिक वर्गणी मनीऑर्डरने पाठवावी.
- प्रसिद्धी दरमहा १५ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी : *मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता, १२१६ सदाशिव पेठ,धनश्री अपार्टमेंटस्, पुणे-३०. फॅक्स : ०२०-४४७५४६२


*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*